# खेळण्यांचा जादूगार
## अरविंद गुप्ता

कानपूरच्या आय.आय.टी.तून इंजिनिअर झालेल्या, टेल्कोत पाच वर्षं नोकरी केलेल्या अरविंद गुप्तांनी नंतर तथाकथित 'यशस्वी' आयुष्याकडे पाठ फिरविली आणि ध्यास घेतला मुलांसाठी काम करण्याचा. जगभरातील बालसाहित्य भारतीय भाषांत आणण्याचा. मुलांना खेळातून विज्ञान शिकवण्याचा. त्यांच्या खांद्यावरच्या पोतडीत कितीतरी नवी खेळणी असतात. त्यांनी स्वत: बनविलेली. त्यांचं आयुष्यही जत्रेतल्या जादूगारासारखं अनेकांवर गारुड करणारं. फकिरी पत्करणारं. भातात मीठ कालवून खाणारं. कामगारांच्या वस्तीत खोपटात राहणारं. उपजीविकेसाठी रस्त्यावर खेळणी विकणारं. अनिल सद्गोपाल, लॉरी बेकर वगैरेंचा सहवास अनुभवणारं. जुन्या बाजारात पोत्यानं पुस्तकं विकत घेणारं. मरणासन्न आईची सेवा करणारं. मूल होऊन स्वत:च्या मुलीला वाढवणारं. घरात भांडीकुंडी घासणारं. चांगली पुस्तकं वाचून गदगदणारं. शेकडो देशी-परदेशी लोकांचं जाळं विणणारं. 'खेल खेल में' सारख्या स्वत:च्या पहिल्याच पुस्तकाच्या पाच लाख प्रती विकणारं. जगभरातील ७५ पुस्तकं भारतीय भाषांत आणणारं. लोक म्हणतात, 'हा माणूस आजचा ''महात्मा गांधी'' आहे.' हे अरविंद गुप्ता आता 'आयुका'च्या मुलांसाठी सुरू होणाऱ्या मुक्तांगण विज्ञान शोधिकेचे संचालक झाले आहेत.

# खेळण्यांचा जादूगार
## अरविंद गुप्ता

शोभा भागवत



कजा कजा मरू प्रकाशन

# खेळण्यांचा जादूगार

## - अरविंद गुप्ता

शोभा भागवत

**खेळण्यांचा जादूगार – अरविंद गुप्ता**

**लेखक**
शोभा भागवत

**प्रकाशक**
कजा कजा मरू प्रकाशन
द्वारा : गरवारे बालभवन
सारसबागेसमोर, पुणे ४११ ००२
फोन : २४४४ २१०९

**आभार**
साप्ताहिक सकाळ

**मुखपृष्ठ**
आभा भागवत

**छपाई**
मुद्रा, ३८३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : २४४५६८३६

**मूल्य**
रु. ३०/–

अरविंद गुप्तांची भेट म्हणजे एक झपाटून टाकणारा अनुभव असतो. त्यांच्या खांद्यावरच्या पोतडीत किती तरी नवी खेळणी असतात, त्यांनी स्वत: बनवलेली, कुठल्याही छोट्या गावात सहज मिळेल अशा साहित्यातून केलेली! आगपेटीतल्या काड्या आणि सायकलची बारीक ट्यूब यांच्यापासून केलेला मेकॅनो ते दाखवतील. एक सेल आणि लोहचुंबक वापरून केलेली मोटार दाखवतील. कॅमेऱ्याच्या रोलच्या दोन रिकाम्या डब्या आणि मध्ये जोडलेली सायकलची टायरट्यूब या सोप्या हवेच्या पंपाने फुगा फुगवून दाखवतील. पेन्सिलीला पाडलेल्या खाचांवर रिकामी रिफील घासून चक्र फिरवून दाखवतील. पोटात काचेची गोटी घेऊन तुरूतुरू पळणारा कागदाचा उंदीर दाखवतील.

ही खेळणी थक्क करणारी असतातच; पण ती दाखवतानाचा अरविंदच्या चेहऱ्यावरचा आनंद, उत्सुकता 'ये बहुतही अद्‌भूत खिलौना है! 'Its's amazing' असं म्हणत त्यांचं मनापासून खळखळून हसणं – हा सगळा अनुभव आपल्यालाही प्रचंड उत्साह देऊन जातो.

कायम आपल्या कामांबद्दल, आवडलेल्या पुस्तकांबद्दल, भेटलेल्या चांगल्या माणसांबद्दल, नव्याने केलेल्या खेळण्यांबद्दल, पुस्तकांबद्दल हा माणूस भरभरून बोलतो. नुसतं बोलत नाही, तर दर काही मिनिटांनी 'I must give you that book', I must show you that article.' असं म्हणून नवी नवी पुस्तकं, लेख देत असतो.

आता ते आयुकाचा एक भाग असलेल्या 'मुक्तांगण विज्ञान शोधिका' या केंद्राचे संचालक म्हणून पुण्यात आले आहेत. या मुक्तांगण विज्ञान शोधिकेसाठी सुनीता देशपांडे यांनी मोठी मदत दिली आहे. जयंत नारळीकरांनी आयुकामध्ये शालेय मुलामुलींनी येण्याची चांगली परंपरा निर्माण केली आहे. ती वाढवणं, मुलांचं जिथं मुक्त स्वागत असेल, असं एक विज्ञान केंद्र निर्माण करणं, मुलांना जिथं जगभरातील चांगली पुस्तकं मिळतील, असं पुस्तकांचं संग्रहालय करणं,

शाळाशाळांमधून सोपे विज्ञान उपक्रम पोचवणं, असं काहीसं या केंद्राचं काम असेल. अरविंद गुप्तांसारखी व्यक्ती या केंद्राची जबाबदारी घेत आहे, ही 'ऐतिहासिक' घटना ठरणार आहे.

## आईचा प्रभाव

अरविंद मूळचे बरेली गावचे. बरेली हे उत्तर प्रदेशातील दिल्लीपासून अडीचशे किलोमीटर अंतरावरचं छोटंसं गाव. आई–वडील दोघंही कधी शाळेत गेले नाहीत. गुप्तांचं घर हे परंपरागत व्यापार करणारं.

आई कधी शाळेत गेली नाही; कारण मुलींना तेव्हा शिकवण्याची पद्धत नव्हती. आईचे दोन्ही भाऊ मात्र खूप शिकलेले आहेत. मोठा भाऊ इंजिनिअर. त्यानं स्वत:चे कारखाने सुरू केले. यशस्वीपणे चालवले. छोटा भाऊ शल्यविशारद. आग्रा मेडिकल कॉलेजमधून सुवर्णपदकं मिळवलेला.

आई शिकलेली नव्हती, तरी आपली चारही मुलं शिकली पाहिजेत, हे तिचं एकमेव ध्येय होतं. अरविंदना दोन मोठे भाऊ, एक मोठी बहीण आहे. तेव्हा घरची परिस्थिती अशी होती, की वडिलांना धंदा जमत नव्हता. पैशांची कायम ओढाताण होती. आईनं मुलांच्या शिक्षणासाठी सगळे दागिने विकून टाकले. माझी मुलं शिकली पहिजेत, हा एकच ध्यास होता.

बरेलीत तेव्हा एकच इंग्रजी शाळा होती. ख्रिश्चन शाळा होती ती. त्यात आईनं मुलांना घातलं. नातेवाइकांनी, गावातल्यांनी खूप विरोध केला. तुमची मुलं ख्रिश्चन होतील, इंग्रज होतील, असं लोक म्हणायची; पण आई ठाम होती. ही चांगली शाळा आहे आणि माझी मुलं याच शाळेत शिकणार, असं आईनं ठरवलं होतं.

ही शाळा खरंच चांगली होती. शाळेच्या प्रमुख 'मदर सुपीरियर' एक इटालियन बाई होत्या. त्यांनी अरविंद अकरावी झाल्यावर त्यांच्या वहीत एक संदेश लिहून दिला, 'If you want to love god, serve the poor.' परमेश्वरावर प्रेम करायचं असेल, तर गरिबांची सेवा कर.

अरविंदच्या पुढल्या सगळ्या कामात आणि विचारात हा गरिबांचा विचार कायम त्यांच्याबरोबर राहिलेला दिसतो. या शाळेनं खूप चांगली मूल्यं शिकवली. लोकांविषयी सद्भावना शिकवली आणि लोकांशी कसं वागावं तेही शिकवलं.

आई धार्मिक, पारंपरिक विचारांची नव्हती. रोज मुलं शाळेतून आली, की मुलांशी ती दोन–तीन तास गप्पा मारायची. आज काय काय केलं शाळेत, असं विचारायची. मग अरविंद म्हणतात, 'हम पुरे दिनभर की राम कहानी सुनाते थे। दिलकी बात कहते थे।' ते पुढे हसत हसत असंही म्हणतात – आज पालक म्हणतात, 'क्वालिटी टाइम' देतो; पण मुलांना तुमचा फक्त वेळ हवा असतो.

आईनं मुलांना प्रचंड आत्मविश्वास दिला आणि आत्मसन्मान शिकवला. वडिलांकडे कधी पैसे नसायचे. नेहमी कर्ज असायचं, तरी आई सांगायची 'बाहेर कोणाशीही बोलताना मान ताठ ठेवून बोलायचं आणि समोरच्याच्या डोळ्यांकडं पाहून बोलायचं. कोण खाली मान घालून बोलतो? ज्याला दुसऱ्याकडून काही हवं असतं तो! आपल्याला कोणाचं काही नको आहे.'

आई फार वेगळी होती. त्यामुळे छानसं लहानपण मिळालं. घरात वर्तमानपत्रदेखील यायचं नाही. बाहेरच्या जगाची फारशी ओळख नव्हती. काही फारसं माहीत नसायचं. उन्हाळ्याच्या सुटीत कधी मामाकडे गेले आठ–पंधरा दिवस, तर तेवढाच वेगळा अनुभव.

लहानपणी कोणी अभ्यासासाठी त्यांच्या मागं लागायचं नाही. हे करा ते करा असंही कोणी सांगायचं नाही. अरविंद तासन् तास स्वतःच्या गोष्टी करत बसायचे. त्यांचा एक खेळाचा डबा होता. कोणतीही वस्तू कधी फेकून द्यायचे नाहीत. खूप वस्तू जमवत राहायचे. काहीही करत बसले, तरी आई रागवायची नाही. ती म्हणायची, 'जो कुछ कर रहा है वह अच्छाही होगा!' कधी क्लासला गेले नाहीत. शिकवणी नव्हती. काही अडलं, तर भावाला, बहिणीला विचारायचं.



## कानपूर आयआयटीत

अरविंद ७० मध्ये बारावी झाले. जिल्ह्यात पहिला नंबर आला. पुढे काय करायचं ठरलं नव्हतं; पण कानपूर आयआयटीमध्ये प्रवेश घेतला. तिथल्या ३५० नव्या मुलांमध्ये यांचा अठ्ठाविसावा नंबर होता. आधीच्या २७ मुलांनी 'इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग' ही शाखा घेतली म्हणून यांनीही घेतली. हीच आवड असं काही नव्हतं.

कानपूर आयआयटी ही तेव्हा जणू आकाशातून भूमीवर अवतरलेली संस्था होती. नऊ अमेरिकन विद्यापीठांची मदत घेऊन ती सुरू केली होती. त्यामुळे सगळीकडं अमेरिकेचा फार प्रभाव होता. वीस-तीस अमेरिकन प्राध्यापक तिथं शिकवत होते. वर्ग वातानुकूलित असत. अनेक प्राध्यापक खरोखर थोर म्हणावेत असे होते. नोबेल पुरस्कारासाठी ज्यांची नावं सुचवली गेली होती, असे तिघं जण तेव्हा तिथं शिकवत होते.

अखिलेश नावाचा अरविंदचा एक मित्र होता. त्याला यंत्र दुरुस्त करायचा नाद होता. हे दोघं मित्र जुन्या बाजारात जायचे, सामान आणायचे. यंत्रांवर काम करायचे. एअरो मॉडेलिंग (छोटी खेळातील उडणारी विमानं) पण करायचे.

तो काळ राजकारणानं भारलेला होता. नक्षलवादी चळवळही जोरात होती. गांधीजींनी सांगितलेलं होतंच, 'खेड्यांकडे चला. तिथल्या माणसांवर प्रेम करा, त्यांच्याबरोबर काम करा.' त्यामुळे गरिबांकडे जावं, त्यांच्याबरोबर राहावं, त्यांच्याकडं जे आहे, त्यातून कामाला सुरवात करावी, काही तरी निर्माण करावं असं अनेक तरुणांच्या मनात होतं.

आयआयटी कानपूरमध्येही क्रांतीच्या गोष्टी करणारी बरीच मंडळी होती. या तरुणांना त्यांची सगळी भाषा कळत नव्हती. पण काहीतरी करावं, असं वाटत होतं.

प्राध्यापकांच्या मुलांसाठी तिथं दोन शाळा होत्या; पण कामगारांच्या मुलांसाठी काही नव्हतं. जेवण घरात तर कामगार सकाळी ५ ते रात्री ११ वेजेपर्यंत काम करत. अरविंद आणि त्यांच्या मित्रांना याचं फार वाईट वाटायचं. त्यांनी चार मित्रांचा एक 'सहयोग ग्रुप' स्थापन केला आणि 'ऑपरच्युनिटी स्कूल' नावाची शाळा सुरू केली. 'संधी शाळा!' ते चौघं आठवड्यांतून एकेक दिवस कॉलेज बुडवायचे आणि मुलांना शाळेत शिकवायचे. संध्याकाळी पुन्हा कॉलेज संपल्यावर त्यांच्या अभ्यासातल्या अडचणी सोडवायचे.



त्या काळात कानपूरमधील कापडाचे, चामड्याचे कारखाने बसले होते. आजूबाजूला फार गरिबी होती; पण आयआयटीला तिच्याशी काही देणं-घेणं नव्हतं. जणू काही आयआयटीनं तिची मुळं तोडूनच टाकली होती. या परिसराला आयआयटीचा काहीही उपयोग नव्हता. एका बाजूला गरिबी आणि दुसरीकडे हे आयआयटीचं मृगजळ.

जवळच एक नानकारी म्हणून गाव होतं. तिथून ७-८ मुलं अरविंदांकडे संध्याकाळी शिकायला येत. त्यांना ते गणित-विज्ञान शिकवत होते. ५ वर्षे त्यांनी या मुलांना शिकवलं आणि ग्रामीण मुलांच्या शिक्षणातल्या प्रश्नांची पहिली ओळख झाली.

७२ मध्ये अनिल सद्‌गोपालना आयआयटीमध्ये बोलावलं होतं, डी. बालसुब्रह्मण्यम म्हणून रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. ते आणि अनिल अमेरिकेत पीएच.डी. करतानाचे सहकारी. तेव्हा अनिलनी हुशंगाबाद विज्ञान कार्यक्रम सुरू केला होता आणि बालसुब्रह्मण्यम तिथे उन्हाळ्याच्या सुटीत जायचे. कमी खर्चातले रसायनशास्त्रातले प्रयोग शोधून काढायचे. अनिल आणि मीरा सद्‌गोपाल तेव्हा टीआयएफआरमध्ये मॉलिक्युलर बायॉलॉजीमध्ये काम करत होते.

हा काळ असा होता, की बरेच बुद्धिजीवी लोक आपली भूमिका शोधत होते. जगभरच हा प्रयत्न चालू होता. याप्रकारे खूप ऊर्जा बाहेर येऊ पाहत होती. राजकीय उलथापालथ चालू होती आणि आपली अर्थपूर्ण सामाजिक भूमिका लोक शोधत होते. अनिल सद्‌गोपाल अशा लोकांपैकी होते. ग्रामीण मुलांना कशाप्रकारे शिकवावं हा प्रश्न त्यांच्यासमोर होता. गावातून त्यांना विरोध होता. ते सांगत होते, हे कठीण काम आहे. त्याचं सगळं सांगणं अरविंदच्या खूप आतवर पोचलं. एवढा चांगला उच्चशिक्षित माणूस ग्रामीण भागात जातो, काम करतो आणि ते सोपं नाही हे सांगतो हे सगळं त्यांना विलक्षण वाटलं.

बी.ई.ची पदवी घेतल्यावर ७५ मध्ये टेल्कोमध्ये आले. दोन वर्ष तर शिकण्याचा काळ होता. दोन वर्षांनंतर सुट्टी मिळाली तेव्हा १५ दिवसांची रजा घेतली आणि अनिलला पत्र लिहिलं, 'मला तुमचं काम पहायला यायचं आहे.' त्यांनी सांगितलं, 'तुझे स्वागत आहे. केव्हाही ये.'

मग हुशंगाबाद विज्ञान कार्यक्रमात तिथे १५ दिवस राहिले. आसपासच्या वस्तू वापरून विज्ञान शिक्षण कसं करता येईल याचा शोध घेणं तेव्हा चालू होतं. ते काम त्यांना अतिशय आवडलं.

## प्रयोगांना सुरवात

७८ मध्ये त्यांनी तिथं काम सुरू केलं. सकाळी नाश्ता करून सायकलवरून जवळपासच्या गावांमध्ये जायचं. मुलांना शिकवायचं, संध्याकाळी ७–८ वाजता थकून घरी परत यायचं.

तिथे बनखेडी गावाचं गाव होतं. त्यांचा शुक्रवारी बाजाराचा दिवस असायचा. बाजारात ज्या वस्तू विकायला होत्या त्या सगळ्या अरविंदनी एकेक नमुना म्हणून विकत घेतल्या. हेच त्यांचं 'रॉ मटेरियल' होतं. एक जण सायकलीत हवा भरत होता. त्याच्याकडे व्हॉल्व्ह ट्युब होती. ते म्हणतात, 'Materials fascinate me' विविध साहित्याचं, माध्यमाचं त्यांना वेड होतं. खटपट करायला आवडायची. त्यांना तेव्हा कल्पना नव्हती, काय उपयोग होईल या व्हाल्व्ह ट्यूबचा. १० पैशाला एक फूट होती. १ रु. ची घेऊन आले.



एकदा ते असेच काडेपेटीतल्या काड्यांशी खेळत होते. व्हॉल्व्ह ट्युबचे तुकडे होते आणि ती ट्युब काडीवर छान बसली. एक जोड झाला. हा काड्यांच्या मेकॅनोचा जन्म होता. आज २५ वर्ष झाली त्या गोष्टीला.

कॉलेजमध्ये असल्यापासून लॉरी बेकर हे अरविंदचं स्वप्न होतं. त्यांना सिव्हिल इंजिनिअरिंगची काही बॅकग्राऊंड नव्हती; पण ते एक दिवस गाडीत बसले आणि त्रिवेंद्रमला गेले. त्यांना वाटलं, लॉरी बेकरना कोणा मदतनिसाची जरुरी असेल अरविंद हिशेब चांगले करू शकत. त्यांना मदत करायचा बेत होता आणि त्यांचं कामही पहायचं होतं.

लॉरी बेकर थोर रचनाकार (डिझायनर) होते आणि त्याहूनही माणूस म्हणून फार मोठे. दर मिनिटाला विनोद करतील. हसतील, कार्टून काढून दाखवतील. साठीच्या आसपासचे असतील ते तेव्हा. अरविंद म्हणतात, आपल्याकडे सर्वसाधारणपणे हा विनोद, हसरेपणा, प्रसन्नता नसते. आपण गंभीर चेहरे करून बोलतो. जणू काही हा समाज बदलण्याची जबाबदारी आपल्याच डोक्यावर आहे. मला वाटलं अरविंद स्वत: असंच हसत खेळत मोकळेपणानं विनोद करत बोलतात म्हणून त्यांना या गुणांचं कौतुक वाटलं असावं. ते तीन महिने तिथे राहिले. रजा बिनपगारी होती. पगार नव्हता. जवळ पैसेच नव्हते. मग पैसे कसे मिळवायचे? ते रोज दोन तास सकाळी मॅचस्टिक मेकॅनो बनवायचे आणि

रस्त्याच्या कडेला उभं राहून विकायचे. एक सेट एक रुपयाला असे दहा सेट विकायचे. तेवढे दहा रुपये खर्चाला पुरायचे. त्रिवेंद्रममध्ये तेव्हा डोसा ७५ पैशाला मिळायचा.

रहायला जागा नव्हती. 'मित्रनिकेतन' नावाच्या संस्थेत विश्वनाथन नावाचे थोर शिक्षण शास्त्रज्ञ भेटले. त्या संस्थेची एक जागा होती. वीज-पाणी नव्हतं. एवढी किरकोळ अडचण होती. अरविंद आनंदात तिथे रहायला गेले.

एक दिवस असेच जात होते तर तिथे स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ लँग्वेजेस होती. ती पण लॉरी बेकरनी डिझाइन केली होती. त्रिवेंद्रममध्ये खूप संस्था लॉरी बेकर यांनी डिझाइन केल्या आहेत. तिथं अरविंद स्केचेस करत होते, नोट्स काढत होते, तर कोणीतरी विचारलं काय करता आणि आत कृष्णकुमारकडे (कृष्णकुमार हे केरळ शास्त्र साहित्य परिषद या संस्थेचे ज्येष्ठ कार्यकर्ते) नेलं. ती त्यांची आणि कृष्णकुमारची पहिली भेट. त्यांनी विचारलं, 'तुम्ही काय करता?' 'इंजिनिअर आहे. टेल्कोत काम करतो. एक वर्ष स्टडी लीव्ह घेतलीय आणि लॉरी बेकरकडे आलो. किशोरभारतीमध्ये काम केलंय, 'तर त्यांनी विचारलं, 'विज्ञान शिक्षणातील तुम्हाला काय काय माहीत आहे?' हे म्हणाले, 'फार काही नाही; पण मला व्हॉल्व्ह ट्युब. काडेपेट्या दिल्यात तर काही करून दाखवतो.' त्यांनी सामान मागवलं आणि त्यांनी त्यांना करून दाखवली ती मॉडेल्स - काड्यांचे त्रिकोण, चौकोन इतर भूमितीय आकार, रचना पाहून ते हरखून गेले. ते म्हणाले, 'संध्याकाळी मुलांसाठी एक लेक्चर आहे. त्यात हे करून दाखवाल का?' अरविंदनी हो म्हटलं. के.एस.एस.पी.बरोबर अशी अचानक ओळख झाली. ते लोक १०-१५ वर्षांपासून काम करत होते.

मग अरविंदांनी परत दोन वर्ष टेल्कोत काम केलं. टेल्कोतही कामगारांबरोबर बरेच प्रयोग केले. ते दुरुस्तीच्या विभागात होते. कोणतंही मशिन खराब झालं, की दुरुस्तीचं लॉगबुक इंग्रजीत असायचं. ते कुणाही कामगाराला वाचता येत नसे. हे म्हणाले, 'हे मराठीत लिहायला हवं.' आज आपण माहितीच्या अधिकाराबद्दल बरीच चर्चा करतो. आपण एकमेकांकडून खूप शिकू शकतो. त्या वेळी टेल्कोत खूप तरुण मंडळी काम करत. त्यांना शिकण्याची इच्छा होती. मग ते कामगारांना म्हणाले, 'चला मी तुम्हाला सर्किट डायग्राम शिकवतो. ज्ञान काही इंजिनिअरची मक्तेदारी नाही.' अनेक प्रयोग केले. हेतू हा, की कामगारांना

शिकायला मिळावं. सर्वांनी पुढे जात एकमेकांपासून शिकावं. कामगारांना म्हटलं, 'उद्या कारखाना बंद झाला आणि आपण रस्त्यावर आलो, तर निदान म्हणू शकू आम्हाला हे येतं, ते येतं.' ते त्यांना पटलं. इंजिनियरना टेबलखुर्ची असे. त्यावर कधी बसले नाहीत. टूलबॉक्सवर बसून कामगारांशी गप्पा मारायचे. इंजिनिअरना पांढरे कोट असत. तोही त्यांनी कधी घातला नाही. ट्रेनिंगच्या वेळी तीन हिरवे सूट दिले होते. त्यांना मोठाले खिसे होते. तेच त्यांना आवडायचे.

टेल्कोचं काम चालू होतं. चांगला पगार होता. पगार बहुतेक पुस्तकं खरेदीत संपायचा; पण नोकरीत मन लागेना. एका वर्षाची सुटी घेतली. त्यात खूप प्रश्न सतावत राहिले. लोक इतके गरीब का आहेत? लोक कशावर जगतात? त्यांना काही उत्तरं हवी होती. त्यांनी ठरवलं, की आपल्या गरजा कमी आहेत. राहणी साधी आहे. फार पैसे लागत नाहीत, तर ही नोकरी सोडून द्यायला हवी. इथे बारा तास कामात गेले, की वाचायला वेळच उरत नाही. हे काही बरोबर चाललेलं नाही.

मग दोन वर्षांनी ते शहाडोल जिल्ह्यात अनुपपूरला गेले. आयआयटीचे चार लोक तिथं काम करत होते आणि एक मित्र अविनाश देशपांडे जे.जे. स्कूलचा. या ग्रुपचं नाव 'विदूषक कारखाना'. या ठिकाणी या सगळ्या प्रश्नांची चर्चा करता येत होती. तिथं एक ट्रेड युनियन होती. छत्तीसगडमध्ये खाणकामगार होते. त्यांच्या मुलांसाठी दहा शाळा सुरू केल्या होत्या. दली राजराला ते एका शाळेत काम करायला गेले. ते एक वृत्तपत्र काढायचे 'मितान' नावाचं. ते अरविंद स्वत:च्या हस्ताक्षरांत लिहायचे. त्याच्या २००० कॉपीज काढायचे, लोकांना पोचवायचे, पैसे गोळा करायचे. हे काम ऐकूनही आई म्हणायची, 'जो कर रहा है वो अच्छाही होगा!' नंतर ८१ मध्ये आई कॅन्सरनं गेली. तिच्या आजारपणात सगळं काम सोडून तिच्यापाशी वर्षभर राहिले.

एकदा बहिणीचे यजमान आले. गंमतीने म्हणाले, 'कोणी तुझ्याशी लग्न करेल का माहित नाही. आपण वर्तमानपत्रात निदान एक जाहिरात देऊ या. जे काही लिहावं असं वाटतं ते लिहून दे.' अरविंदनी लिहिले, 'I.I.T. कानपूरचा इंजिनिअर, ५ वर्षं टेल्कोत काम केलं आहे. सध्या ट्रेड युनियनचं काम करतो. घटस्फोटित, विधवा, मुलं असलेली, नसलेली, जात, वय यांची अट नाही. हुंडा वगैरे नको. सर्वांचं स्वागत आहे.' ६० पत्रं आली. कोणाच्या वडिलांनी, कोणाच्या भावानं लिहिलं; पण ४–५ मुलींनी स्वत: पत्रं लिहिली. त्यात पुण्याची सुनीता



पंधे होती. ती वडिलांबरोबर आली. दली राजराला तिनं अरविंदला पाहिलं आणि नंतर त्यांनी लग्न करायचं ठरवलं. चेन्नईला बहीण राहायची. तिथं अर्ध्या तासात आर्य समाज पद्धतीनं लग्न झालं. वडील आणि भाऊ फक्त होते. बाकी कोणी नव्हतं.

सुनीतानं त्यांना पाहिलं होतं. ते कुठं राहतात, काय काम करतात माहीत होतं. मजुराची वस्ती होती. कष्ट खूप होते. पैसे फार नसत. कधी कधी तर मीठ आणि भात एवढंच परवडत असे. मग तिनं पुण्यातील नोकरी सोडली आणि वर्षभर तिथल्या शाळांमध्ये काम केलं.

अरविंद पुढं सांगत होते, 'तिथे सुनीता एक वर्ष राहिली. मग दुलारीच्या जन्माच्या वेळी ८४ मध्ये आम्ही पुण्याला आलो. टेल्कोमध्ये मला नोकरी मिळू शकली असती; पण मी ठरवलं आता कारखान्यात काम करायचं नाही; पण थोडेफार पैसे तर मिळवायला हवे होते.''

## खेल खेल में

''प्रोफेसर यशपाल तेव्हा डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे सेक्रेटरी होते. त्यांनी फिजिक्समध्ये पीएचडी केलं होतं ते हुशंगाबादला एका प्रशिक्षण

कार्यक्रमात विज्ञानाचे शिक्षक म्हणून आले होते. त्यांनी अहमदाबादला माझ्या काडेपेट्यांच्या मेकॅनोवरचा माहितीपट पाहिला. त्यांना तो फार आवडला. मी त्यांना एक पोस्टकार्ड पाठवलं, 'मी पुण्यात परत आलो आहे आणि हुशंगाबादमध्ये केलेल्या कामावर मला एक पुस्तक लिहायचं आहे. मला तुम्ही फेलोशिप देऊ शकाल का?' ते म्हणाले, 'हे फार चांगलं काम आहे.' आणि त्यांनी मला फेलोशिप दिली. त्यात पुस्तकाच्या २००० प्रती छापण्याचा उल्लेख होता; पण प्रत्यक्षात पुस्तक पाहून ते म्हणाले, '२५,००० प्रती छापू.' हे माझं पहिलं, 'खेल खेल में' पुस्तक. १५ महिन्यांसाठी फेलोशिप होती. अविनाश देशपांडेंनी येऊन ८ दिवस पुण्यात राहून चित्रं काढून दिली. तेव्हा त्याला द्यायला माझ्याकडे पैसेही नव्हते; पण नंतर हे पुस्तक १३ भारतीय भाषांमध्ये छापलं गेलं. पाच लाखांहून जास्त प्रती संपल्या. सहा राज्यांत ते 'ऑपरेशन ब्लॅक बोर्ड' साठी निवडलं गेलं. महाराष्ट्रात ग्रंथालीनं २५,००० प्रती छापल्या. 'खेल खेल में'च्या पहिल्याच पुस्तकानं असं प्रचंड यश मिळवलं. मुख्य आनंद याचा वाटला, की अनेक मुलांपर्यंत हे पुस्तक पोचलं. विज्ञान ही किती सोपी गोष्ट आहे हा संदेश सगळीकडे पोचला.

या पुस्तकानंतर असं वाटू लागलं, की दर वर्षी असं एक पुस्तक आपण तयार करायलाच हवं.''

एकदा मुंबईला शिरीष पटेलांकडे बसले होते. शिरीष पटेल मुंबईतले मोठे ऑर्किटेक्ट. बोलता बोलता विषय निघाला, की अमेरिकेतून जॉन होल्ट या शिक्षणतज्ज्ञाचं एक 'Growing without schooling' नावाचं नियतकालिक निघतं; पण ते फार महाग आहे. घेणं परवडत नाही, तर लगेच शिरीष पटेलांच्या पत्नी म्हणाल्या, 'माझी मुलगी अमेरिकेत असते. मी तिला कळवते. ती हवं तर बेबीसीटिंग करेल; पण त्या पैशानं तुमची वर्षाची वर्गणी भरेल; आणि तसं त्यांच्या मुलीनं केलं. ती लोकं ग्रेटच! अरविंदना ते नियतकालिक येऊ लागलं.

तर या नियतकालिकात जॉन होल्टनं 'तोत्तोचान' या जपानी कादंबरीचं परीक्षण लिहिलं होतं. अरविंद म्हणतात, 'वो पढके तो हम गदगद हो गये!' त्या परीक्षणाच्या खूप प्रती काढल्या आणि अनेक लोकांना पाठवल्या. तेव्हा एक प्रत शांता रामेश्वरराव यांना पाठवली. त्या तेव्हा ओरिएंट लाँगमनच्या अध्यक्षा होत्या. स्वत: अतिशय मोठ्या शिक्षणतज्ज्ञ. हैदराबादमध्ये त्यांची एक चांगली

शाळा आहे 'विद्यारण्य' नावाची गेली ४० वर्षं त्या काम करतायत. त्यांचं लगेच उत्तर आलं, 'हे पुस्तक काढायला मला आवडेल आणि योगायोग पाहा – कालच मला ते कोणीतरी पाठवलं आहे.' अरविंदांना हा धक्काच होता. त्यांना कळवलं, की 'तुमचं वाचून झालं, की एका दिवसासाठी मला ते पाठवा, मी प्रत काढून तुम्हाला लगेच पुस्तक परत करीन.' त्यांनी ते पुस्तक नंतर पाठवलं. अरविंदांनी त्याच्या खूप झेरॉक्स प्रती काढल्या आणि खूप जणांना पाठवल्या. एनबीटीचे श्री. अरविंदकुमार संचालक होते. त्यांना ही कादंबरी खूप आवडली. त्यांनी ती छापेर्यंत ५–६ भारतीय भाषांमध्ये आली होती. यावरून एक लक्षात आलं, की चांगलं साहित्य असेल तर लोक कुठल्याही अनुदानाची वाट न पाहता आपलं आपण छापून टाकतात. मराठीत ती विलास चाफेकर यांनी त्यांच्या निर्मळ रानवारा प्रकाशनातून छापली. याच वेळी गिजुभाई बधेकांचं 'दिवास्वप्न' वाचनात आलं. किती लोकांनी शिक्षणाबद्दल पुस्तकं लिहिलीत; पण हे आपल्याच मातीतलं इतकं सुंदर पुस्तक. एक मोठा शैक्षणिक प्रयोग आम्हालाच माहीत नव्हता. हे सुंदर पुस्तक इतकी वर्षं आम्हाला उपलब्धही नव्हतं. त्यासाठीही त्यांनी ४००–५०० पत्रं लिहिली. एनबीटीनं ते छापलं. केरळ शास्त्र साहित्य परिषदेनं छापलं. मराठीत 'इंडियन इन्स्टिट्यूट'नं छापलं. अरविंदच्या मनात ते कोसबाडनी छापावं असं होतं; कारण गिजुभाई बधेका हे ताराबाईंचे गुरू. त्यांचं पुस्तक तिथंच निघणं योग्य होतं; पण त्या संस्थेला ते शक्य झालं नाही. दहा–बारा भारतीय भाषांमध्ये ते आता आलं आहे. अप्रतिम पुस्तक आहे. आजही शिक्षकांनी करून पाहावा असा तो प्रयोग आहे. अरविंद म्हणतात, 'आपले शिक्षक उत्सुक आहेत चांगली पुस्तकं वाचायला. आपण आपल्या शिक्षकांना नावं ठेवतो; पण जगातल्या कुठल्याही देशात इतके चांगले शिक्षक नसतील. त्यांना खूप इच्छा आहे चांगलं वाचण्याची; पण मिळत नाहीत चांगली पुस्तकं. मिळतात ती महाग असतात. याबाबतीत खूप काही करायला हवं आहे. डेंजर स्कूल, दिवास्वप्न, टीचर, तोत्तोचान कितीतरी पुस्तकं सर्व शिक्षकांनी वाचावीत अशी आहेत.

आपल्या शिक्षणक्षेत्रात चांगल्या पुस्तकांचा अभाव आहे. एक मोठी पोकळी आहे ती भरून काढायला हवी आहे. एनबीटीनं काही पुस्तकं छापलीत. केएसएसपीचं आणि माझं तर पुस्तकांचं नातं आहे. गेल्या २०–२२ वर्षांत मी

त्यांना ३५ पुस्तकं पाठवली. त्यांना ती माहीत नव्हती. ती त्यांनी मल्याळमध्ये छापली. पैशांची देवाणघेवाण काही नाही पण पुस्तकांची आहे. अशी सगळ्या राज्यांत चांगली पुस्तकं यायला हवीत.

अशी चांगली पुस्तकं भारतीय भाषांत आणणं या कामाला अरविंद नेहमी, 'हे आपलं ऐतिहासिक काम आहे,' असं म्हणतात. आपण सर्वांनी ते करत राहायला हवं असं त्यांना वाटतं.

## मुलांचं वाढणं

१९९० मध्ये दुलारी ४–५ वर्षांची होती. तेव्हा सुनीता पुणे विद्यापीठात वीमेन्स रीसर्च सेंटरमध्ये काम करत होती. पीएच.डी.साठी जेएनयूमध्ये जायचं ठरवलं आणि त्यांनी दिल्लीला जायचं ठरवलं. दुलारीला 'मिरांबिका' सारखी अरविंद आश्रमाची चांगली शाळा मिळणार होती. या दोन कारणांनी हे कुटुंब दिल्लीला गेली.

पुण्यात दुलारी एका शाळेत जात होती. पण तिला शाळा आवडायची नाही. अरविंदपाशी तेव्हा लुना होती. ते सकाळी तिला घेऊन जायचे; पण ती वाटेत म्हणायची, 'मला नाही जायचं शाळेत.' तेव्हा बाबा म्हणायचे, 'ठीक है। कोई जरुरी नही है, स्कूल जाना।' मग ते दोघं एम्प्रेस गार्डनमध्ये जायचे. तिथं पानं गोळा करायचे, काड्या गोळा करायचे आणि काही वेळानं आनंदानं घरी यायचे. तिला सांगितलं होतं, 'तुला जेव्हा शाळेत जावंसं वाटेल तेव्हा आपण तुला शाळेत घालू.'

सुनीतानी सांगितलं, 'मिरांबिकामध्ये तिचं नाव घालायचं होतं तेव्हा तिथल्या प्रिन्सिपॉल म्हणाल्या, तिला एक दिवस येऊ दे. खेळू दे. आम्ही तिचं निरीक्षण करू आणि ठरवू प्रवेशाचं, तर अरविंद म्हणाले, 'हो, माझ्या मुलीलाही एक दिवस सगळी शाळा बघू दे आणि ठरवू दे तिला ही शाळा आवडते आहे का, या शाळेत यायचं आहे का नाही ते.' ही लहान मुलांच्या आत्मसन्मानाची समज होती!

मिरांबिकाचा अनुभव फार चांगला होता. चांगली शाळा आहे. काही बंधनं नाहीत. गणवेश नाही, प्रार्थना नाही, होमवर्क नाही. मुलं आनंदानं खेळतात, शिकतात. योगी अरविंदांचे दोन अनुयायी आहेत, त्यांनी ती सुरू केली. एक सायकियाट्रिस्ट आहेत. डच आहेत. 'मथाइस' त्यांचं नाव. दुसऱ्या 'नीलशे'. त्यादेखील डच आहेत. मुलं स्वत:च ठरवतात त्यांना काय शिकायचं आहेन् ते

मुलांवर काही लादायचं नाही. काय शिकायचं ते मुलं ठरवतात आणि शिक्षकांचं काम त्यांना फक्त मदत करण्याचं. दुलारी पहिलीत असताना या मुलांनी ठरवलं आपण चिनी भाषा शिकायची. मग त्यांनी चिनी शिकवलं. या मुलांना हिंदीसुद्धा नीट येत नव्हतं; पण ४–५ महिने चिनी शिकत होती.

एका वर्गात १२–१५ मुलं असायची. 'इट वॉज अ व्हेरी चाइल्ड फ्रेंडली प्लेस, व्हेरी अनअथॉरिटेरियन स्कूल'. सगळं काम प्रकल्प पद्धतीनं चालायचं. 'पक्षी' असा प्रकल्प घेतला, की मुलं पक्ष्यांबद्दल माहिती गोळा करायची, पक्षी पाहायला जायची, पक्ष्यांची चित्रं काढायची, पक्ष्यांच्या गोष्टी, पक्ष्यांची गाणी, पक्ष्यांची नाटकं, सर्व बाजूंनी प्रकल्पात अभ्यास व्हायचा आणि तोही आनंदानं, मुलांच्या स्वतःच्या प्रयत्नातून.

सहावीत दुलारी सरदार पटेल विद्यालयात गेली. त्यांच्या प्रिन्सिपॉल म्हणजे एक थोर व्यक्तिमत्त्व होतं. पार्थसारथी नाव होतं त्यांचं. २५ वर्षं त्या शाळेत होत्या. फार प्रगतिशील नव्या विचारांच्या होत्या. त्यांचा जन्म नैरोबीत झाला; पण आश्चर्य म्हणजे त्यांचे आई–वडील गिजुभाईंचे विद्यार्थी होते. त्या सांगत, 'आमच्या घरात कुणा देवी–देवतांचे फोटो कधी नव्हते; पण वडिलांच्या खोलीत गिजुभाईंची तसबीर होती.'



## दुलारी

दुलारी हे अरविंदच्या आईचं नाव, तेच मुलीचंही – दुलारीविषयी ऐकून मला तिच्याशी बोलावं असं वाटलं. मी तिचा वेल्लोरचा फोन नंबर घेतला.

मी लहान असल्यापासून आई–बाबा, आजी–आजोबा मला खूप पुस्तकं वाचून दाखवायचे. त्यामुळे वाचनाची गोडी लागली; पण सुरवातीला तरी माझा वाचायचा वेग खूप कमी होता. कुणी वाचून दाखवत असेल, तर स्वत: वाचावंसं कशाला वाटेल ना? नंतर मात्र मी खूप वाचायला लागले.

आमच्या घरात माझी मतं मी मोकळेपणानं बोलून दाखवत असे. त्याला कधी कोणी आडकाठी आणली नाही; पण आता बाहेर वावरताना मला जरा कठीण जातं. दर वेळी आपलं मत व्यक्त करून चालत नाही असं वाटतं.

माझ्या मैत्रिणी मला म्हणायच्या तू किती भाग्यवान आहेस तुला असे वडील मिळाले! पण मी माझ्या वडिलांना गृहीतच धरलेलं होतं, त्यामुळे लहानपणी त्यांचं वेगळेपण मला जाणवायचं नाही.

आईवडिलांनी माझ्यासाठी खूप वेळ दिला. बाबा इतकी खेळणी आणायचे, की माझ्याकडे कायम पाच मुलांना पुरतील एवढी खेळणी असत. बाबांना स्वत:ला पण खेळण्यात खूप रस असायचा. प्रत्येक खेळणं अधिक सोप्या पद्धतीनं, स्वस्त साहित्यापासून कसं तयार करता येईल याचे त्यांचे प्रयोग चालायचे.

रात्रीच्या जेवणानंतर आम्ही इतका वेळ गप्पा मारत बसायचो, की हात वाळून जायचे; पण आमच्या चर्चा, वाद संपायचे नाहीत. जागतिकीकरणाचा माणसांवर कसा सूक्ष्म परिणाम होत जातो याबद्दल आमची चर्चा असायची. बाबांनी केलेल्या सोलर कुकरवर वाद असायचा. कितीतरी विषय असायचे. धरणं, पर्यावरण, ऊर्जाबचत.

बाबांच्या कार्यशाळांना आम्हीपण जायचो. त्यांनी मला मुलगी म्हणून काही वेगळी वागणूक दिली नाही. मी रागावलेच असते असं काही केलं असतं तर....

मला डॉक्टर होऊन ग्रामीण भागात काम करायचंय. मला आई–बाबांनी ज्या प्रकारे वाढवलं आहे त्यातूनच हा निर्णय आला असं मला वाटतं. आमची विचार करण्याची पद्धत सारखी आहे, त्यामुळे ते मला जास्तच जवळचे वाटतात. त्यांच्यामुळे मला जगाकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन मिळाला असं मला वाटतं.

त्यांना असं वाटायचं, की मुलांनी एक तरी भारतीय भाषा शिकली पाहिजे. आपल्या एवढ्या भाषा आहेत! या दर्जाची ही दिल्लीतील एकमेव शाळा – जिथे पहिली ते पाचवीचं शिक्षण हिंदीतून होतं. त्यांना असं वाटायचं, की फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, रशियन भाषा मुलं शिकतात; पण भारतीय भाषा शिकली नाहीत, तर 'अपनीही जबान से बच्चे कट जाएंगे!' मग बांगला, उर्दू, गुजराथी, तमीळ एक तरी भाषा तीन वर्षं शिकावी असा शाळेचा आग्रह होता. खूप विचारपूर्वक बनवलेलं हे धोरण होतं. या शाळेत मुलांच्या मनात स्पर्धा निर्माण होऊ नये म्हणून जागरूकपणे प्रयत्न केले जायचे. आज आपण राष्ट्रीय एकात्मता असं म्हणतो; पण शाळेतही दम हवा ही भावना निर्माण करण्याचा. तसे उपक्रम हवेत याची त्यांना जाण होती.

शाळेत एक, दोन, तीन नंबर नसायचे; पण काही चांगलं केलं, की कौतुकपत्र मिळायचं. रांगोळीची स्पर्धा असली, तर ५० मुलांनी भाग घेतला. ३० जणांना कौतुकपत्र मिळालं, असं व्हायचं.

अरविंद–सुनीतानं दुलारीची शाळा अगदी काळजीपूर्वक निवडली होती. खूप लोकांना अशा शाळेबद्दल शंका असते, की या शाळेतून मुलं पुढं कॉलेजमध्ये गेली, की तिथं स्पर्धेत त्यांचा कसा निभाव लागेल, कसा टिकाव धरतील, यांना तर स्पर्धेची सवयच नाही; पण यांना कधीही भीती वाटली नाही. ही मुलं समाजात चांगली सामावली जातात. जुळवून घेतात.

दुलारी लहानपणी अशी दंगेखोर नव्हती. पुस्तकं खूप वाचायची. बागेत घेऊन गेले तरी झोपाळे, घसरगुंड्यांपेक्षा तिला पानं, दगड गोळा करायचं वेड होतं. ते गोळा करून ती त्यांचे गट करत बसायची.

आठ–नऊ वर्षांची असल्यापासून ती शिवण करते. फार सुंदर शिवते. शाळेत तर तिनं तिचे चार ब्लाऊज शिवले होते. अरविंद म्हणाले, 'मी तिला म्हटलं सबंध शाळेत तू एकटीच मुलगी असशील स्वत: शिवलेले ब्लाऊज घालणारी.' 'यू शुड फील व्हेरी प्राऊड.' आताही ती स्वत:चे कपडे स्वत:च शिवते. ती १२ वर्षांची होती तेव्हा हिमानीचा (अरविंदच्या बहिणीची मुलगी) वाढदिवस होता, तर दुलारीने चार तासांत तिला ड्रेस शिवून तोही खिशांसह, स्वत: नेऊन दिला.

मिरांबिकामध्ये दुलारी असताना सर्व मुलं कुठल्या ना कुठल्या क्लासला जायची. दुलारी एकटीच अशी होती, की जी क्लासला जात नसे. तिच्या



शिक्षकांनी सुनीताला बोलावून सांगितलं, तिलाही एखाद्या क्लासला घाला. मग घराशेजारीच एक उडिया मंदिर होते. ती तिथे ओडिसी नृत्य शिकायला जाऊ लागली. एक–दोन महिने गेली असेल; पण 'दॅट वॉज नॉट हर कप ऑफ टी' तिनं ते सोडून दिलं. आम्हीही आग्रह केला नाही.

अलीकडे पालक मुलांना किती क्लासना पाठवतात. चित्रकला, पोहणं, टेनिस, तायक्वोंदो, नृत्य, नेचर कॅम्पस. मुलांवर फार ताण पडतो. आणि मूल क्लासला जात नसेल, तर सगळे त्याला असं बोलतात, की जणू काही हे ठीक नाही चाललेलं. जॉन होल्टनं म्हटलं, की आता श्वास घेण्याचे क्लासच सुरू करायचं राहिलंय, हा आजारी समाज आहे, मुलं आपल्या आपण खूप गोष्टी शिकत असतात याचा मोठ्यांना विसर पडला आहे.

डेव्हिड एल्काइंड नावाचा मानसशास्त्रज्ञ आहे. त्यानं म्हटलं, की मुलांना स्वत:चा असा बराच वेळ मोकळा ठेवावा लागतो. 'दे नीड लार्ज चंक्स ऑफ टाइम'. ते शांतपणे एखादी गोष्ट करतात, विचार करतात, प्रयोग करतात, त्यातून शिकतात; पण सारखी धावाधाव केली, तर त्यांच्यातील शांती नाहीशी होते.

आपण आपलेच अंतर्विरोध मुलांवर लादत राहतो. आपल्याला जे करता आलं नाही ते त्यांनी करायलाच हवं असं म्हणतो. सर्वांगीण विकास म्हणजे अनेक क्लासना जाणं नाही. दुलारी कधी फारशी खेळली नाही; पण त्याची त्यांनी कधी चिंता केली नाही. 'उसे नही पसंद तो ठीक है। कौन सी बडी बात

है।' असं म्हटलं. आता ती मेडिकल कॉलेजला आहे तर नेहमी सांगत असते, आम्ही आज या खेळात हरलो. कधी त्या खेळात हरलो; पण हे चांगलं आहे, की त्याचं तिला काही वाईट वाटत नाही. तिच्या मनात स्पर्धा नाही; पण तिला मजा वाटते सगळ्यांची.

दुलारीचं सगळं लहानपण अरविंदबरोबर गेलं. अरविंद म्हणाले, 'ती खूप वेळ माझ्याबरोबर असायची. मी घरातच असायचो. तिला वाटायचं हा वेगळ्याच प्रकारचा बाबा आहे. स्वयंपाक करतो. कपडे धुतो. घरगुती कामं करतो. तिला अर्थात त्याचा अभिमान वाटायचा. मिरांबिकामध्येही ती एकटीच मुलगी अशी होती, की तिला पोचवायला घरची गाडी नव्हती. पॉश घर नव्हतं. माझी एक जुनी स्कूटर होती; पण तिला त्याचा कधीही न्यूनगंड नव्हता. हे फार चांगलं होतं.'

तिच्या आत शांती होती असा याचा अर्थ आहे. सुनीता म्हणाली, 'अजूनही ती इतकी काटकसरी आहे, की आम्हाला तिला सांगावं लागतं, की अग, स्वत:साठी काही खर्च कर. हा साधेपणा तिनं अरविंदकडून घेतला आहे. मेडिकल कॉलेजमध्ये वेल्लोरलाही ती इतका कमी खर्च करते, की आम्हाला वाटतं शाळेच्या शिक्षणालाही याहून जास्त खर्च येतो.'

दुलारीबद्दल बोलायला आई-बाबांना फार आवडत होतं. मनापासून बोलत होते; पण त्यात कुठे हे आम्ही घडवलं असा अविर्भाव नव्हता. 'दुलारी आत्ता तिच्या एका सुटीत सितलिंगीला जाऊन आली. डॉ. जॉर्ज रेगी आणि त्यांच्या पत्नी यांनी फार चांगलं काम केलंय. धर्मपुरी भागात तमिळनाडूत आदिवासीमध्ये. त्यांचा परिचय रीडर्स डायजेस्टमध्ये आला होता. २-३ बस बदलून ती गेली. ती अशी २-३ दिवस सुटी असली की जाते. भाषा येत नाही तरी जाते. आम्हाला तिचं फार कौतुक वाटतं, 'दिल्ली' प्रकारच्या मुलांपेक्षा हे जरा वेगळं आहे.'

'दुलारीच्या या मानसिक शांतीसाठी आम्ही काही वेगळं नाही केलं. ती जे काही करायची त्याचा आम्हाला आनंद वाटायचा आणि अभिमानही.'

अरविंद म्हणाले, 'ती माझ्यावर एकदम कडक टीका करते. बाबा हे काय चाललंय? स्वत:चं काहीतरी करा. भाषांतरं नकोत.' तिच्या टीकेची मला फार मदत झाली. बाहेर कसं लोक 'छान आहे' म्हणतात, 'पण माझ्या घरातच माझ्यावर कडक टीका करणारा जबरदस्त टीकाकार आहे आणि तो वारंवार टीका करतो.'



'मुलं काही चार दिवसांत घडत नाहीत हेच खरं.' मला आठवलेलं मी बोलले. 'आभानं. माझ्या मुलींनं अगदी साध्या पद्धतीनं लग्न केलं. तिला मी विचारलं, 'लग्न साधं करायचं हा निर्णय तू कसा घेतलास?' त्यावर ती म्हणाली, 'हा एका दिवसात घेतलेला निर्णय नसतो. तुम्ही यापूर्वी २५ वर्षं कसं जगलात, काय केलंत, समारंभांचा विचार कसा केलात, कपडे कोणते वापरलेत, खरेदी कसली केली या सगळ्याचा तो परिणाम असतो.'

या जोडप्यानं आपल्या मुलीला फार मनापासून वाढवलं आहे. आमचं तुझ्यावर प्रेम आहे. आमचा तुझ्यावर विश्वास आहे. तुझ्या मताचा आम्ही आदर करतो. तुला वाटेल ते मोकळेपणानं बोल ही वाक्यं त्यांना कधीच बोलावी लागली नाहीत, असं त्यांचं प्रत्यक्ष वागणं होतं.

त्यांचं म्हणणं हेच आहे, 'मुलं तुम्हाला आरपार पाहू शकतात. खोटं त्यांना लगेच कळतं आणि चालतही नाही. त्यामुळे जसे तुम्ही आहात तसं वागा. कशाचाही देखावा करू नका.'

## स्वप्नातली पुस्तकं

अरविंदनी स्वत: प्रयोग करून शोधून काढलेली वैज्ञानिक खेळणी अनेक आहेत. त्यावर लिहिलेली खेल खेल में, कबाड से जुगाड, खिलौनोंका बक्सा, अशी अनेक स्वत:ची पुस्तकं आहेत. ती सगळी पुस्तकं हिंदी–इंग्रजी अशा जोडभाषेत आहेत.

याशिवाय दिल्लीच्या भारत ज्ञानविज्ञान समितीनं अरविंदची ७५ भाषांतरीत पुस्तक प्रकाशित केलीत आजवर. ही पुस्तकं कशी तयार झाली, त्यामागं काय विचार होता, याबद्दल त्यांनी सांगितलं –

'ही पुस्तकं तयार केल्यानं मला खूप समाधान मिळालं आणि गंमतीची गोष्ट अशी, की BGVS बरोबर मीटिंग्जही झाल्या नाहीत, इतका त्यांचा विश्वास होता, मी पुस्तकं निवडत होतो, भाषांतर करत होतो, चित्रं काढून घेत होतो. कधी स्वत:च काढत होतो. पुस्तक छापून घेणं एवढंच काय विक्रीलाही मदत करणं सगळं मी मनापासून केलं. त्यांनी यात कुठंही मोडता घातला नाही.'

'मला यात खूप समाधान मिळालं; कारण यातील अनेक पुस्तकं भारतीय भाषांत येणं हे माझं स्वप्न होतं. पर्यावरणाबद्दलची, युद्धाच्या विरोधातील, शांतीची पुस्तकं. द मॅन हू प्लान्टेड ट्रीज (जिसने उम्मीद के बीज बोये), गिव्हिंग ट्री (दानी पेड), तोत्तोचान, शिक्षणावरची काही उत्तम पुस्तकं, विज्ञानावरची जगभरातील चांगली पुस्तकं.' ते जगभरातील उत्तम बालसाहित्य छापत गेले. वेंडा गॅगचं उदाहरणार्थ 'बिल्लीयोंकी बारात' सदाबहार कहानी आहे ती. इतकी सुंदर चित्रं आहेत त्यात.

एक एक पुस्तक छापत आजवर आठ लाख पुस्तकं विकली गेली आहेत. पुस्तकंच इतकी चांगली आहेत, की ती इतर कुठं मिळणार नाहीत.

मन्रो लीफचं 'फर्डिनंड की कहानी' असंच पुस्तक आहे. अरविंदनी नेटवर ही गोष्ट वाचली. ही गांधीजींना फार आवडायची. शांतीवर आधारित ती गोष्ट आहे. एक बैल असतो. त्याला मारामाऱ्या आवडत नसतात. झाडाखाली बसून फुलांचा वास घेणं त्याला आवडतं. त्याला मारामारीच्या मैदानात नेतात, तर तिथं बघायला आलेल्या स्त्रियांच्या केसात सुवासिक फुलं माळलेली असतात. त्यांचा वास घेत तो बसून राहतो. 'बैलांची झुंज' होतच नाही, रद्द होते. अशी ही गोष्ट. दिल्लीत तर या गोष्टीवर नाटकंही केली लोकांनी. ती फारच लोकप्रिय आहे.

शेल सिल्व्हरस्टाइनचं "Giving Tree!' याचं अरविंदनी 'दानी पेड' म्हणून भाषांतर केलं. 'देणारं झाड'. किती सुंदर गोष्ट आहे! एक मुलगा आणि एक झाड यांच्या नात्याची ती गोष्ट आहे. तो मुलगा झाडाखाली येतो, खेळतो, पानं गोळा करतो, झाडावर चढतो, फांद्यांना लोंबकाळतो, फळं खातो, झाडाचं त्याच्यावर फार प्रेम असतं. मुलगा मोठा होतो. लग्नासाठी झाडाकडं पैसे मागतो. झाड

आपली फळं देऊन टाकतं. मुलगा आणखी मोठा होतो. घर बांधायला पैसे मागतो. झाड सर्व फांद्या देतं. मग मुलगा प्रौढ होतो, होडी करायला लाकूड मागतो. झाड खोड देऊन टाकतं. मग तो आणखी म्हातारा होतो. आता त्याला काही नको असतं. स्वस्थ बसायचं असतं, तर झाड त्याला म्हणतं माझ्या बुंध्यावर बस ना. आता तेवढाच शिल्लक आहे माझ्याकडे. या सर्व प्रसंगात देणाऱ्या झाडाला आनंदच होत असतो; पण घेणाऱ्या माणसाचं कधीच समाधान होत नाही.

सुनीताच्या एका मैत्रिणीनं एक जपानी पुस्तक दिलं. ती जपानी शिकवते. तिनं आईका सुबोटा या बारा वर्षांच्या जपानी मुलीनं लिहिलेलं पुस्तक दिलं. Secrets of the Earth 'पृथ्वी के रहस्य' त्याचं हिंदी नाव. चित्रं काढून, संवाद लिहून असं ते लिहिलं आहे आणि ते पुस्तक पूर्ण केल्याच्या दुसऱ्या दिवशी ती मुलगी वारली आणि नंतर अनेक संस्थांनी एकत्र येऊन ते पुस्तक छापलं. हे पुस्तक इतकं अप्रतिम आहे, की केवळ एखादं मूलच ते लिहू शकेल!

रेड बलून नावाची फ्रेंच गोष्ट आहे. त्यांना ती नेटवर मिळाली. ती हिंदीत केली आहे. एका मुलाची आणि लाल फुग्याची मैत्री असते. मुलगा जाईल त्याच्या मागं मागं तो फुगा जायचा. त्यातून खूप गंमती व्हायच्या. एकदा दुष्ट मुलं तो फुगा फोडतात, तर गावातले सगळे लाल फुगे मुलाभोवती जमा होतात आणि त्याला उंचावर नेऊन चक्कर मारून आणतात. फार सुंदर गोष्ट आहे.

या प्रकारच्या साहित्याचा एवढा अभाव आहे, की अशी पुस्तकं येत राहिली पाहिजेत. आता तोत्तोचानसारखं पुस्तक अनेक लोकांनी आपण होऊन छापलं. अशी साखळी कायम राहायला हवी. हळूहळू सर्व भारतीय भाषांमध्ये ही पुस्तकं येतील. आपण ही साखळी चालू ठेवायला हवी. जगातील उत्तम साहित्य आपल्या मुलांना मिळायला हवं. मुलांसाठी लिहिणं ही सर्वांत कठीण गोष्ट आहे. त्यामुळे सगळीकडचं चांगलं साहित्य सगळीकडे पोचायला हवं!

त्यांनी 'जिसने उम्मीद के बीज बोये' हे Man who planted trees चं भाषांतरीत पुस्तक काढल्यावर काहींनी सांगितलं, की ही 'जॉनी ॲपलसीड'च्या गोष्टीसारखी आहे. त्यांना ती गोष्ट माहीत नव्हती. ती शोधली. २५० वर्षांपूर्वीची ती गोष्ट आहे. सफरचंदांचा रस तयार करणाऱ्या कारखान्यांतून हा जॉनी पोती भरभरून बिया गोळा करायचा आणि अमेरिकाभर लोकांना वाटत जायचा.

त्याच्यामुळे आज अमेरिकेत सगळीकडे सफरचंदांची झाडं आहेत असं म्हणतात. खूप छान गोष्ट आहे.

असं जगातलं उत्तम, दुर्लभ साहित्य कमी किमतीत आपल्या मुलांपर्यंत पोचवणं हे आपलं 'ऐतिहासिक कार्य' आहे, असं अरविंद म्हणतात. मला तर जॉनी ॲपलसीड आणि झाडं लावणाऱ्या त्या माणसाच्या जागी अरविंदच दिसू लागले. जे जे चांगलं मिळालं त्याची बीजं सगळीकडे पोचवणारे, वाचन संस्कृतीची रोपं सगळीकडे लावणारे अरविंद म्हणूनच ही पुस्तकं त्यांच्या मनाला भिडतात. स्वत:च्या पोटचं पोर दाखवावं तशा कौतुकानं ते ही पुस्तकं आपल्याला दाखवतात. एवढा आनंद चेहऱ्यावर पसरलेला असतो! तो आपल्यापर्यंत पोचतोच! ही धडपड एक सांस्कृतिक वातारण निर्माण करण्याची आहे!

लू शूं म्हणून चीनचे एक थोर लेखक होते. त्यांनी ३०% स्वत:चं लेखन केलं; पण आयुष्यभर जगभरातलं चांगलं साहित्य लोकांच्या चिनी भाषेत भाषांतरीत करत राहिले. चीनची भूमी वाळवंटासारखी मरुभूमी होती. ते म्हणायचे, इथे तुम्ही चांगलं बी पेरलंत तरी ते मरून जाईल. इथं सगळं उजाड विराण आहे. त्यामुळे जिथं कुठं तुम्ही असाल तिथं थोडी माती निर्माण करा. माती निर्माण होत नाही तोवर फुलं उमलणार नाहीत. सांस्कृतिक वातावरण नसेल, तर साहित्य



रुजणार नाही. त्यामुळे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट त्यांना वाटते. ते त्यांना 'जीवन जगण्याचं तत्त्वज्ञान' वाटतं.

स्वत: काम करण्याबरोबर अनेक संस्थांना कामाला लावण्याचं कौशल्य अरविंद यांच्यामध्ये आहे. एनबीटी सरकारी संस्था आहे. ३० सुंदर पुस्तकांची त्यांना अरविंदनी यादी दिली होती. ती त्यांनी छापली. प्रत्येक संस्थेत काही चांगली माणसं असतात आणि ती चांगलं काम करून जातात.

अनेक संस्थांतील माणसं त्यांचे मित्र आहेत. देशात–परदेशात किती तरी मंडळींशी त्यांचा संपर्क आहे आणि एकदा ओळख झाली, की ती टिकवण्याचा गोडवा त्यांच्या व्यवहारात आहे.

अरविंद गुप्तांच्या मित्रमंडळींचं जाळं जगभर पसरलेलं आहे. त्यांच्याशी ते सतत संपर्क कसा ठेवतात ते समजून घेण्याजोगं आहे. ते म्हणतात –

''माझ्या मित्रांच्यात आणि माझ्यात मैत्रीचा दुवा निर्माण होतो तो पुस्तकांच्या आणि विज्ञानाच्या प्रेमामुळे. १९८०च्या सुमाराला मी एकदम ४०० पोस्टकार्ड विकत आणायचो आणि रोज ३०–४० तरी पोस्टकार्ड लिहायचो. कधी चांगलं पुस्तक वाचनात आलं की लगेच त्याचा परिचय मी मित्रांना पाठवून द्यायचो. पुस्तकाची किंमत जर माझ्या आवाक्यातली असेल तर अनेक प्रती विकत घेऊन मी मित्रांना पाठवायचो. यामधूनच भारतातलं शिक्षणावरचं मूलभूत महत्त्वाचं पुस्तक गिजुभाई बधेकांचं, 'दिवास्वप्न' ११ भारतीय भाषांत भाषांतरित झालं. तोत्रोचान, टीचर, डेंजर स्कूल आणि अशी अनेक पुस्तकं अशीच प्रकाशात आली.

१९८० च्या सुरवातीला पुण्यात फोटोकॉपिअर्स मशीन्स आली. मी शिक्षण, शांतता, पर्यावरण, स्त्रीवाद अशा विषयांवरची पुस्तकं घेऊन त्याच्या मायक्रो–झेरॉक्स प्रती काढायचो. अशा माझ्याकडे जवळ जवळ १५० अप्रतिम पुस्तकांच्या मास्टर कॉपीज् होत्या. मग मी या पुस्तकांची यादी केली आणि त्यांच्या झेरॉक्स प्रतींच्या किंमती पुस्तकांपुढे लिहून ती यादी माझ्या सर्व मित्रांना पाठविली. मनीऑर्डर आली की लगेच पुस्तकाची प्रत पाठवणं माझं काम. पुस्तकं प्रकाशित करण्याइतके किंवा छापून घेण्याइतके पैसे माझ्याकडे नसल्यामुळे माझी स्वप्नं इतरांपर्यंत पोचवण्याचा हाच मार्ग होता.

कितीही वेळा अपयश आलं तरी मी प्रयत्न क्वचितच सोडून देतो. मी डेंजर स्कूल प्रथम वाचलं तेव्ही मी उडालोच! शिक्षणाच्या सर्व कल्पना उलथून टाकणारं ते कार्टून रूपातलं पुस्तक होतं. मी पाऊलो फ्रिअरेच्या ग्रुपला जिनिव्हामध्ये अनेक हवाईपत्रं पाठवली. (तेव्हा ई–मेल अस्तित्वात नव्हती.) त्यांनी प्रथम दुर्लक्ष केलं आणि माझ्या अनेक पत्रांना उत्तरच पाठवलं नाही. पण मी पण मागे हटलो नाही. अखेरीस त्यांना बहुतेक कंटाळा आला माझ्या पत्रांचा आणि त्यांनी ते पुस्तक प्रकाशित करायला मला परवानगी दिली. पण माझ्याकडे तर पैसे नव्हते. तेव्हा मी माझ्या नऊ मित्रांना पत्र लिहिली आणि त्यांनी सगळ्यांनी १५ दिवसांच्या आत मला पैसे पाठवले. एक महिन्यात डेंजर स्कूलच्या १००० प्रती निघाल्या आणि माझ्या ९ मित्रांना प्रत्येकी शंभर प्रती वेगवेगळ्या प्रांतात पोचल्या देखील. सहकार प्रकाशनाचं हे माझं पहिलं धाडस होते.

जॉन होस्टच्या पुस्तकांच्या मी प्रेमात पडलो आणि पॅट फरेंगांशी पत्रव्यवहार करीत होतो. ते होल्ट असोसिएशनचे गेली १५ वर्ष अध्यक्ष आहे. जॉन होल्ट यांची अनेक पुस्तकं इंग्रजीत आणि इतरही भाषांत प्रकाशित करण्याची परवानगी मिळवून देण्यासाठी त्यांनी बरीच मदत केली.

बऱ्याच वर्षांपूर्वी मी ॲन सायर वाइजमन यांचं 'मेकिंग थिंग्ज' हे पुस्तक झेरॉक्स करून घेतलं होतं. पुस्तक मला अतिशय आवडलं होतं. जवळ जवळ दहा वर्षांनी मला ह्या विलक्षण लेखिकेची वेबसाइट सापडली. काय नवल! त्यांनी सहा महिने पुढे मुक्काम केला असेल म्हणता तर खुद्द पुण्यात! रजनीश आश्रमात! तेही १९७६ या वर्षी. आमचा जोरदार पत्रव्यवहार सुरू झाला आणि त्यांनी दिलदारपणे पुस्तक मराठीत आणि हिंदीत अनुवादित करायला अनुमती दिली. त्यानंतर ॲन सायर आमच्याकडे पुण्यात आठवडाभर राहून गेल्या.

अनेक मालक आणि शिक्षकांना शिक्षणातल्या चांगल्या प्रयोगांबद्दल वाचायची इच्छा असतो. आपण अशी पुस्तकं स्थानिक भाषांत अनुवादित करायला हवीत आणि अल्प किंमतीत वाचकांपर्यंत पोचवायला हवीत.

प्रिय बाई (लेटर टु अ टीचर), नीलची शाळा (समरहिल), बहुरूप गांधी अशी काही पुस्तकं आम्ही आजवर प्रकाशित करू शकलो आहोत.

आपल्या देशात सार्वजनिक वाचनालय कमी आहेत. मात्र इंटरनेटवर खूप चांगली पुस्तकं वाचायला मिळू शकतात. तीन वर्षांपूर्वी मी अींळपवसीीिंिाी.ला

नावाची वेबसाइट सुरू केली. हेतू असा की आपल्या स्वप्नातली पुस्तकं इतरांपर्यंतही विनामूल्य पोचवता यावीत. या वेबसाइटला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आता या साइटवर १००० अप्रतिम पुस्तकं आहेत. शिक्षण, पर्यावरण, शांती, बॉम्बविरोधी, युद्धविरोधी, विज्ञान आणि गणिताच्या कृती, मुलांसाठीची सुंदर पुस्तकं अशी अनेक विषयांवरची जगभरातली पुस्तकं आहेत. टाकाऊ वस्तूंमधून केलेला खेळण्यांचे १५०० फोटो आहेत आणि कोणालाही हे सगळं विनामूल्य डाऊनलोड करता येईल. यातली बरीचशी पुस्तकं कित्येक वर्षात पुन्हा छापलेलीच नव्हती त्यामुळे मिळतही नव्हती.

रोज जवळ जवळ २०० लोक या वेबसाइटला भेट देतात. आम्हाला धन्यवाद देणारी अनेक पत्रं येतात. १० जून २००८ या दिवशी भेट देणाऱ्या लोकांनी १ लाखाचा आकडा ओलांडला. घाना, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान या देशांमधल्या काही लोकांनी तर आमच्या संपूर्ण वेबसाइटची सी.डी. तयार केली आहे आणि ती शिक्षणातल्या लोकांना ते देत आहेत अशाप्रकारे चांगली पुस्तकं एकमेकांना विनामूल्य देण्याची मोठी गरज आपल्या देशात जाणवते आहे आणि मला विश्वास वाटतो आहे की, अशा पुस्तकांची आपल्या भारतीय भाषात लवकरच मोठ्या प्रमाणावर भाषांतरं होतील.

आता गेली पाच वर्षं मी पोस्टकार्ड लिहिणं पूर्ण बंद केलं आहे. आती मी ५०–६० ई–मेल्स रोज लिहितो, माझ्या जगभरातल्या मित्रांना. त्यांच्यापैकी अनेकांचा माझ्या वाढीत मोठा सहभाग आहे!''

ते असंही म्हणतात की, एकदा माझी कुणाशीही मैत्री झाली की ती आयुष्यभरासाठी जपण्यासाठीच आहे असं मी मानतो.

अनेक चांगल्या पुस्तकांचा शोध घेणं सतत चालू असतं आणि त्याबरोबरच ती प्रकाशित करू शकणाऱ्या आणि ती कमी किंमतीत मुलांपर्यंत पोचवू शकणाऱ्या माणसांचा, संस्थांचा शोधही चालू असतो.

शाळांमध्ये जात राहणं हेही त्यांच्या संपर्काचं एक निमित्त असतं – ''दिल्लीत रोज २–३ नव्या शाळांमध्ये मी जात असे. हे लोक घरून घेऊन जायचे. आणून सोडायचे. थोडे पैसेपण द्यायचे. असा आजवर १३००–१४०० शाळांमध्ये गेलो. विज्ञान खेळण्यांचं प्रात्यक्षिक मी दाखवतो, पण नंतर शिक्षक ते करत नाहीत. मुलांना मात्र त्यातून विज्ञान सोपं आहे, हा संदेश निश्चित जातो.''



''खूप शिक्षकांमध्ये काही करण्याची तळमळ मला जाणवते. असे शिक्षक शिक्षणाची व्यवस्था कितीही बांधलेली असली, तरी त्यात स्वतःसाठी थोडी जागा निर्माण करतात. मला रोज १०–१५ पत्रं मिळायची शिक्षकांकडून की आम्ही हे करून पाहिलं, आणखी चांगली पुस्तकं कुठे मिळतील?''

अरविंदची पुस्तक संग्रहाची आणि पुस्तकप्रेमाची एक वेगळीच तऱ्हा आहे.

''माझं बहुतेक शिक्षण मी जुन्या पुस्तकांवरच केलं. दिल्लीत तर रस्त्यावर, जुन्या पुस्तकांच्या दुकानात खूप पुस्तकं मिळतात. एकदा मी चेन्नईला – बहिणीकडे गेलो होतो. तिचा मुलगा मनीष ७–८ वर्षांचा होता. तिथे मूर मार्केट म्हणून एक विभाग आहे. तिथे मी त्याला घेऊन गेलो. सुंदर क्लासिक पुस्तकं मिळाली. एच.जी. वेल्स वगैरेंची संक्षिप्त पुस्तकं त्यांनी १ रु. ला १ दिलं. मी २०० पुस्तकं घेतली. रिक्षात घालून आणली. भाच्याला सांगितलं, मला हेच परवडतं सध्या. दुकानात गेलो असतो तर चार पुस्तकं आली नसती.''

''दुलारीच्या बाबतीत हे कितीवेळा झालं. आम्ही जुन्या पुस्तकांच्या दुकानातून आख्खी वाचानालयं आणलीत. दिल्लीत दर्यागंज नावाचा पुस्तकांचा बाजार आहे. काही शाळांनी त्यांचे महत्त्वाच्या पुस्तकांचे संच विकून टाकलेले होते. दुलारीची

अशी ३००० पुस्तकं होती. ती खूप वाचायची. शाळेतून आली की रोज २००–३०० पानं तरी वाचायची. काही प्रसिद्ध लेखक, डॉक्टर होते. सॉमरसेट मॉम, चेकॉव्ह तिचे आवडते लेखक. ते डॉक्टर होते. म्हणून बहुतेक दुलारीनी डॉक्टर व्हायचं ठरवलं आहे.''

## मुक्तांगण विज्ञान शोधिका

आयुकामध्ये सुरू होणाऱ्या मुक्तांगण विज्ञान शोधिकेबद्दल बोलणं झालं. अरविंदना एकदा आयुकाचे संचालक नरेश दधीच यांची ई–मेल आली. तुमच्याशी बरंच बोलायचं आहे, एका कामाबद्दल. लवकर भेटा. कोणीतरी मुलांच्या विज्ञान केंद्राचं काम करायला चांगला माणूस हवा आहे आणि अरविंदनी हे काम करण्याचं मान्य केलं.

आयुकाचा एक इतिहास आहे. तो जयंत नारळीकरांच्यामुळे आहे. मराठीत त्यांनी इतकं मूलभूत लेखन केलं आहे. ते आयुकामध्ये असताना आठवड्यातून दोनदा तिथे मुलं यायची. तो कार्यक्रम पक्का करायचा, वाढवायचा आहे आणि अनेक शैक्षणिक उपक्रम सुरू करायचे आहेत, शाळा–शाळांमध्ये उपक्रम जायला हवेत. आयुकामध्ये लोक फार चांगले आहेत.

## विज्ञान शिक्षण

कसं असायला हवं विज्ञानाचं शिक्षण? यावर अरविंदनी बोलावं असं मी म्हटलं – ''खूप शाळा आहेत त्यात आठवीपर्यंत मुलांना थोडं स्वातंत्र्य असतं. नवे नवे अनुभव त्यांना द्यावेत, एक पाया तयार होतो, त्यामुळे ९वी, १०वीचं विज्ञान कठीण जाणार नाही. मुलांसाठी प्रत्यक्ष कृतीतून विज्ञानशिक्षण देण्यासाठी खूप शक्यता आहेत. जोवर त्यांचं हृदय, हात आणि मन एकत्र येऊन काम करत नाही, तोवर खरं शिक्षण होत नाही. ज्या वस्तू मुलं शाळेत वापरतात त्या घरापासून तुटलेल्या नकोत.''

विज्ञानशिक्षणात काय होतं, की प्रयोगशाळा, त्यातली काचपात्रे म्हटलं की मुलं बिचकतात. होशंगाबाद विज्ञान कार्यक्रमात आम्ही हे पाहिलं. घरात मुलं चहादेखील पितळेच्या थाळीतून पितात. काच त्यांनी कधी पाहिलेली नाही, मग

ती विज्ञान प्रयोगांना घाबरतात. विज्ञानाला तुम्ही मुलांच्या सामाजिक संदर्भांपासून तोडू नका. विज्ञान सगळीकडे आहे, हे त्यांना कळू दे. आता साधी चप्पल घ्या. ती वापरून झाली, की तिचा अनेक प्रकारे उपयोग होतो शिक्षणासाठी. वस्तू मुलांच्या वापरातल्या असू देत.

एकदा मला एका शाळेत पर्यावरणावर बोलायला बोलावलं आणि थर्मोकोलचं मोठं जंगल बनवलं होतं. झाडं केली होती. मला तर रडूच आलं ते पाहून. इतकं अज्ञान आहे. थर्मोकोल बनवण्यासाठी किती ऊर्जा खर्च होते आणि ते पुन्हा सहज नष्ट होत नाही. ते पर्यावरणाला धोका आहे आणि त्याचीच झाडं आपण करायची!

सध्या समाजात घ्या आणि फेका अशा वृत्तीमुळे खूप कचरा निर्माण होतो आहे, त्यामुळे शिक्षणासाठी कच्च्या मालाचा तुटवडा नाही. तुम्ही जसं बालभवनमधून मुलांना कारखाने दाखवायला नेता, तेल कसं बनतं, कापड कसे बनते, नॉयलॉनचे दोर कसे बनतात, हा अद्भुत अनुभव आहे. मुलांच्या ते नक्की लक्षात राहील.

## मुलांसाठी विज्ञान संग्रहालयं

बोस्टनला मी एक मुलांचं संग्रहालय पाहिलं. तिथे पन्नास शंभर मोठाली पिंपं ठेवली होती. त्यात सगळं वाया गेलेलं चांगलं साहित्य होतं. मोठमोठे कारखाने असं साहित्य तिथे आणून देतात. अनेक प्रकारचं साहित्य. कोणी शिक्षक आले तर त्यांना १ डॉलरला एक मोठी पिशवी देत. शिक्षक भरभरून साहित्य नेत. एक हॉल होता तिथे एक-दोन शिक्षक होते. तिथे खूप साहित्य ठेवलेलं होतं. अवजारं होती. तुम्हाला जे हवं ते करा, घरी घेऊन जा. आपण हे करू शकू.

आपण नुसती जुनी वर्तमानपत्रं ठेवली तरी मुलांना त्यातून १५ प्रकारच्या टोप्या करता येतात. मी तर शाळांमध्ये वर्तमानपत्राचे ५x५चे तुकडे, मोठा गठ्ठा घेऊन जातो. ओरीगामी करायला. ओरीगामीचा एवढा बाऊ करायचं कारण नाही, असाच कागद हवा असं नाही. ती इतकी छान कला आहे. मुलांच्या हातात ती जायला हवी.

आयुकात मुलांचं कायम स्वागत असायला हवं. दुलारीला मी एक–दोनदा चिल्ड्रन्स सायन्स सेंटरमध्ये घेऊन गेलो दिल्लीला. तिथे निम्म्या गोष्टी तर नादुरुस्त असतात. इतर गोष्टीजवळ माहिती द्यायला कोणी नसतं आणि त्याहून वाईट म्हणजे मुलांना घाबरवायला मधे, मधे पोलिस बसलेले असतात. हे कसलं मुलांचं म्युझियम? मला फार वाईट वाटलं हे सगळं पाहून. बेंगलोरलाही तसंच.

दिल्लीला प्रगती मैदानावर एक म्युझियम आहे. National Science Centre. राजीव गांधींनी २ एकर जमीन दिली. कानविंदेंनी त्याचं डिझाइन केलं. मुलं तिथे येतात आणि काय संदेश घेऊन जातात? आपल्याकडे हे लेझर नाही, हे हायटेक नाही. घरी जाऊन मुलं करतील काय? मी एवढा श्रीमंत नाही. माझ्यापाशी सत्ता नाही. माझ्याकडे या वस्तू नाहीत मी काय करू हे सगळं बघून? मूल सायन्स म्युझियममधून घरी उत्साह, स्फूर्ती, शक्ती घेऊन बाहेर यायला हवं, हे मी करून पाहीन, असं त्याला वाटायला हवं. याउलट या संग्रहालयातून मुलं खचलेल्या रिकाम्या मनानी दडपून बाहेर येतात. नाराज होतात.



गणिताची इतकी भीती मुलांच्या मनात घातलेली असते, की के. श्रीनिवासन म्हणून चेन्नईचे एक तज्ज्ञ आहेत. आता ८० वर्षांचे आहेत. त्यांनी गणित सोपं आहे हे समजावून देण्याचे जेवढे प्रयत्न केले, तेवढे कोणी केले नाहीत. त्यांनी काडेपेटीमधून गणित, कॅलेंडरमधून गणित, झाडूच्या काड्यांमधून गणित, नाण्यांमधून गणित; आजुबाजूच्या प्रत्येक गोष्टीतून गणित, असे लेख लिहिलेत.

टी. सुंदरा रो. चेन्नईचेच होते. १०–१५ वर्षं झाली त्यांनी कागदाच्या घड्यांमधून भूमिती असं पुस्तक लिहिलं. ते इथे छापलं गेलं नाही. डोव्हर म्हणून अमेरिकन प्रकाशक आहेत, त्यांनी ते छापलं. आम्हाला ते माहीत नाही. आपल्या शाळांमध्ये ते वापरले जात नाही. आपल्या देशातल्या ज्ञानाची आपल्याला किंमत नाही.

आपल्या देशात जगातली उत्तम प्रकारची पुस्तकं तयार झालीत, तीदेखील आपण मुलांपर्यंत आणलेली नाहीत. जागोजागी दुकानं असायला हवीत पुस्तकांची. दुकानं म्हणजे मग ती घरातही असू शकतात. मी राजस्थानात काही मित्रमंडळी पाहिली. ते पुस्तकांनी झपाटलेले आहेत. माझ्या घरातून मी गेल्या १५ वर्षांत ३००० दिवास्वप्नं विकली. तोत्तोचानच्या ८००० प्रती विकल्या. मला जे पुस्तक आवडेल त्याच्या मी २५ प्रती विकत घेतो. ही सर्वांत छान गुंतवणूक असते. कोणी येतं तेव्हा मी ते पुस्तक दाखवतो. त्यांना ते हवंसं वाटतं. कुठे मिळेल विचारतात. मी म्हणतो माझ्याकडे आहे. हे आलेले पैसे पुन्हा पुस्तक विकत घ्यायला उपयोगी पडतात. "I am not a bad businessman'. हे अनेकांना करता येईल. NBT नी तोत्तोचान ४० रु. ला काढलं आहे. जगात कुठेही जा त्याची किंमत ४०० रु. आहे. तरी पुण्यात मराठी तोत्तोचान सगळीकडे सहज मिळत नाही. एकलव्यची प्रकाशनं आहेत. किंमती कमी आहेत. ही मुलांपर्यंत पोचायला हवीत. आपण ५००० रु. घालून पुस्तकं घेऊ शकतो. घरात छोटे दुकान चालवू शकतो.

शिक्षणात फळ्याचा वापर यावरचं हे एक पुस्तक. किती सुंदर आहे. प्रत्येक शिक्षकाला अशी चित्रं काढता यायला हवीत. कारण मुलं शब्दात विचार करत नाहीत. चित्रात करतात. चिन्हात, प्रतीकात, करतात. सोप्या सोप्या रेघांमधून काढलेल्या चित्रांची ही खाण आहे. हे पुस्तक इंग्रजीत १७५ रु. ला आहे. Orient Longman ने ते छापलं. त्यांना हिंदी आवृत्तीत काही रस नव्हता.

९० रु. चं पुस्तक होतं. दोन वर्षांपूर्वी त्यावर ४५ रु. चा स्टिकर लावला. ३०० प्रती पडून होत्या. मी त्या सगळ्या घेतल्या. २०० एकलव्यला पाठवल्या. त्यांच्याकडून त्या हातोहात विकल्या गेल्या.''

अशा संधीला अरविंद 'बिल्लीके भागो छींका टूटा' असं म्हणतात. 'मांजरीच्या नशिबानी शिंकंच तुटलं.' शाळांमधील अनुभव अरविंद सांगत होते – ''शाळांमध्ये जातो. शिक्षक विचारतात एका क्लाससाठी तुम्हाला बोलावलं आणखी एक वर्ग आणू का?'' मी म्हणतो, सगळी मुलं येऊ देत.

कधीकधी १८०० मुलांसमोर पण मी प्रात्यक्षिक दाखवलं आहे. कधी ते प्रत्येक वर्गातली ५–५ मुलं आणतात. मी म्हणतो असं नका करू. इतरांनी काय पाप केलं आहे? सर्वांना येऊ दे. 'इतना तो दुर्व्यवहार मत करो बच्चोंसे' आणि आपल्याला काय माहीत कोणाच्या मनात विज्ञानाचं प्रेम आहे? आपल्याला सांगता येणार नाही. ज्याला घ्यायचंय तो घेईल, नाही घ्यायचं तो फेकून देईल. ही तर आपण बीजं पेरतो आहोत. कुठे ते उगवेल माहीत नाही. सर्वांचं स्वागत आहे.''

महाराष्ट्र फार पुरोगामी राज्य आहे. इथे खूप चांगली कामं चालू आहेत; पण लोक आपली आपली बेटं करून राहतात. यात प्रगती नाही. वाढ खुंटते. आपल्याला सर्वांना मिळून पुढे जायचं आहे. आपलं काम एकमेकांपर्यंत पोचवायला हवं. आपलं काम काही देशद्रोहाचं तर नाही. अंडरग्राऊंड नाही. मग एकमेकांचा सहभाग का घ्यायचा नाही?

चांगलं काम सर्वांना जवळचं वाटतं. गिजुभाईंनी भावनगरमध्ये काम केलं. सृजनशील काम आहे. तेलगूमध्ये त्यांच्या दिवास्वप्नची आवृत्ती निघाली. सगळे प्रेमानी वाचतात. डावे–उजवे सर्वांना ते जवळचं वाटतं.

गांधीजींनी म्हटलं आहे, आपल्या घराच्या खिडक्या, दरवाजे, व्हेंटिलेटर्स बंद करू नका, हवा येऊ दे – सर्वांकडून शिकायला हवं. आपल्यावर कोणता शिक्का मारून घ्याल तर तुमची प्रगती खुंटेल, संकुचित मनं होतील, त्याच त्याच घोषणा देत बसाल. पोपट होतील तुमचे. संस्था मोठ्या होतात आणि लोकांच्या मनाशी त्यांचा जुळलेला धागा तुटून जातो. लोकांना काय हवं आहे ते त्यांच्यापर्यंत पोचत नाही. त्यामुळे जे उत्तम साहित्य आहे, उच्च प्रतीचं साहित्य आहे त्याचे सोपे अनुवाद करून छापायला हवेत. वाजवी किंमतीत ते उपलब्ध करायला

पाहिजे. पुस्तकांसाठी मार्केटिंग नेटवर्क तयार करायला हवं. प्रती वाढल्या तरच किंमती कमी होतील.''

नेटवर्किंगचं अरविंदचं कौशल्य कोणत्या व्यवस्थापनशास्त्रात कसं बसवायचं कोण जाणे! हे विलक्षणच आहे.

## वैज्ञानिक खेळणी

अरविंदचे वैज्ञानिक खेळण्यांवरचे विचार फार महत्त्वाचे आहेत. काडेपेट्या, सायकलची व्हॉल्व्ह ट्यूब, जुन्या रिफिल, खोकी, कुंच्याच्या काड्या, जुन्या रबरी चपला, स्ट्रॉज, बिल्ले, बटणं अशा कितीतरी गोष्टी वापरून सोपी साधी वैज्ञानिक खेळणी आज २५ वर्ष ते बनवतायत. या खेळण्यांच्या कल्पना कशा सुचतात? त्यांच्या मागे काय विचार आहे, कोणतं सूत्र आहे, हे समजून घ्यायचं होतं.

सुदर्शन खन्ना अहमदाबादच्या नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ डिझाइनमध्ये काम करतात. त्यांचं Joy of making indian toys पाहिलं. त्यांनी फार मोठं काम केलं आहे. जवळजवळ ३५ वर्ष सर्व राज्यांमध्ये खेड्यापाड्यांत जी पारंपरिक खेळणी हातांनी बनवली जातात, त्यांचा त्यांनी अभ्यास केला.

* ही खेळणी आसपासच्या सहज उपलब्ध असलेल्या साहित्यातून तयार होतात.
* ती पर्यावरणाची हानी करत नाहीत.
* ती मोडली तर दुरूस्त करता येतात.
* त्यांच्या मागे हजारो वर्षांचं संशोधन आहे.
* साहित्याचा, वस्तूचा एक जन्म संपला की खेळणी त्यांना दुसरा जन्म देऊ शकतात. उदा. चिंध्या, चपला.
* या खेळण्यांवर कुणाचा शिक्का, लेबल नाही, हे समाजाचं ज्ञान आहे, तंत्रज्ञान आहे, कोणीही ते वापरू शकतं.
* मुलं ती स्वत: करतात त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, ज्ञान वाढतं.

सुदर्शननी ज्या खेळण्यांबद्दल पुस्तकात लिहिलं त्या प्रत्येकात कोणतं ना कोणतं वैज्ञानिक तत्त्व होतं. अशी ४५ तत्त्वं त्यांनी पुस्तकाच्या शेवटी दिली आहेत. पारंपरिक खेळण्यांमध्ये एवढं विज्ञान आहे.



हे ज्ञान शाळांमध्ये आणायला पाहिजे. ही खेळणी आयती तयार घ्यायची नाहीत. मुलं स्वत: ती बनवतात, त्यामुळे नैसर्गिक साहित्याचा ती आपोआप अभ्यास करतात. स्वत:च्या हातांनी खेळणी केल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. ही खेळणी वापरताना त्यांना तोडफोडीची भीती बाळगावी लागत नाही. नाहीतर घरात आयती महाग खेळणी आली की पालक मुलांवर ओरडतात 'ते तुटेल–मोडेल' ही खेळणी शोकेसमधून पाहण्यासाठी असतात. खेळण्यासाठी नसतातच आणि मग मुलं खेळत बसतात ती वाया गेलेल्या डब्याशी.

नवीन खेळणी जी येतायत, ती – हीमॅन, सुपरमॅन, स्पायडरमॅन सारखी, ही फार ऊर्जा वापरून तयार केलेली असतात. स्त्रीत्वाचे, पुरुषत्वाचे चुकीचे संदेश देणारी असतात आणि बंदुका वगैरे खेळणी हिंसा शिकवतात. पालकांनी, मुलांनी एकत्र काम करून खेळणी तयार करण्याला यात वाव उरत नाही.

चिंचाळकरगुरुजींचा मुलगा दिलीप, त्याची मुलगी गोरय्या. गोरय्या म्हणजे चिमणी. तर गोरय्या लहान असताना शाळेच्या वर्षाच्या सुरवातीला नवीन पुस्तकं आणली की बाप–लेक बसून सर्व पुस्तकांतली चित्रं रंगवायचे. त्यामुळे तिला वर्षभर शाळेत आपली पुस्तकं वेगळी असल्याचा आनंद मिळवायचा. बाप–लेकींनी अभ्यासाच्या पुस्तकातच खेळ शोधला.

बस्तरला खूप काम केलेले एक इंग्रजी अँथ्रॉपॉलॉजिस्ट होते. व्हेदियर एल्विन. त्यांनी माँटेसरीची खेळणी आदिवासी मुलांसाठी नेली. मुलांना त्यात मुळीच रस वाटला नाही. ''खिलौनोंमे तो वहाँ के मिट्टीकी खुशबू होनी चाहिये'' खेळणी मुलांच्या परिसराशी, भावनांशी जोडलेली हवीत. त्यांचं खेळण्यांशी जिवाचं नातं जुळायला हवं.

अहमदाबादला आता toys centre आहे N.I.D. मध्ये आणि तिथे खेळणी डिझाईन करण्याचा पदव्युत्तर अभ्यासक्रम चालतो. दिल्लीत जे.सी.सोनी म्हणून गृहस्थ होते. पाकिस्तानातून आलेले विस्थापित होते. दोन वर्षांपूर्वी ते वारले, पण त्यांनी व्रत घेतल्यासारखी मुलांसाठी स्वस्तातली खेळणी ५० वर्षे तयार केली. भोवरे, भिंगं, दुर्बिणी, मायक्रोस्कोपही करायचे. त्यांच्या मुलांनी मिक्सर्स, ज्यूसर्सचा कारखाना सुरू केला. प्रचंड पैसा मिळवला. तो वडिलांना म्हणायचा काय ही २, ५ रुपयांची खेळणी करत बसता आणि विकत बसता. बंद करा धंदा आणि आराम करा. पण ते शेवटपर्यंत खेळणी करत राहिले.

पुण्यात सुयश डाके आता अशी खेळणी करतात. ती सोनीच्या खेळण्यांहून सुधारित आणि थोडी महागही आहेत पण तरी चांगली आहेत. Third Wave toys असं त्यांच्या उद्योगाचं नाव आहे. बेंगलोरच्या विश्वेश्वरय्या संग्रहालयातही त्यांची खेळणी पहायला मिळतात.

विशाखापट्टणजवळ बीसी ट्रस्ट नावाचे एक खेळण्यांचे उत्पादक आहेत. त्यांनी एकदा त्यांची पेटीभर खेळणी मला दिली होती, चांगली होती.

मी हाँगकाँगच्या 'Playrights Children's playground Association Limited' या संस्थेच्या आमंत्रणावरून हाँगकाँगला गेलो होतो. हाँगकाँगला जागेचा तुटवडा. ३०-४० मजली इमारती. मुलांनी खेळायचं कुठे? मग ही संस्था असा आग्रह धरते की दर सहा मजल्यानंतर एक मजला रिकामा ठेवा मुलांना खेळायला. हाँगकाँगच्या बाहेरच्या बाजूला दरवर्षी चार दिवस एक मेळा भरतो. हजारो चिनी मुला-बाळांना घेऊन येतात. मुलं लाकडाची घरं बनवतात. कागदाच्या वस्तू बनवतात, मजा करतात.

हॉस्पिटल्समध्येसुद्धा मुलांच्या विभागात एक खोली खेळण्यासाठी असते. मी हाँगकाँगमध्ये चिनी पारंपरिक खेळणी शोधत होतो. रस्त्यावर मला दोन-चार चांगली खेळणी मिळाली. पण एक मुलगी माझ्या कार्यशाळेला आली होती. तिने

## अरविंदच्या सासूबाई – विमला पंधे

मी टाइम्समधल्या लग्नाच्या जाहिराती वाचत असताना अरविंदची जाहिरात वाचली. इतर जाहिरातींत लांब केस, गोरा रंग, गृहकृत्यदक्ष, सुशिक्षित, अमुक उंची, तमुक वय असं किती वर्णन असतं; पण ही जाहिरात मला विचित्र वाटली. ‘आयआयटी कानपूरचा इंजिनिअर, टेल्कोत काम केलेला, सध्या ट्रेंड युनियनचं काम. मुलगी घटस्फोटित, विधवा, मुलं असलेली, नसलेली, वय, जात याचं बंधन नाही. हुंडा नको. सर्वांचं स्वागत आहे.’ मी सुनीताला म्हटलं, ‘बघ ग कशी जाहिरात आहे. तू लिही पत्र या मुलाला.’



तिच्या अंगावर थोडे पांढरे डाग होते. ते तिनं पत्रात लिहिलं होतं, तर त्याचं इतकं सुंदर पत्र आलं. त्यात एक कविताही लिहिली होती. निसर्गात एवढं सौंदर्य आहे, पानांवर डाग असतात; पण ती सुंदर दिसतात. त्यांनी तिला भलताच आत्मविश्वास दिला.

तो उंच होता. तिची उंची एवढी नाही, तरी त्याचे विचारच असे होते, की कसलीच अडचण आली नाही. मी खूप भाग्यवान आहे. आमची कुठली तरी पुण्याई असेल म्हणून आम्हाला असा जावई मिळाला. आम्हाला मुलगा नाही; पण त्यांनी मुलापेक्षाही आम्हाला जास्त प्रेम दिलं.

अगदी वेगळाच आहे हा मुलगा. अशी नसतातच मुलं.

तो मार्केटला जातो आणि मोठं खोकं भरून पुस्तकं आणतो आणि चेहऱ्यावर एवढा आनंद असतो! ही याची आवडीची खरेदी!

मी पांडुरंग शास्त्री आठवलेंचा स्वाध्याय करते; पण माझं सुद्धा मन त्याच्याएवढं मोठं नाही. अगदी नि:स्वार्थी, उदार आहे तो. त्यानी जशी त्याच्या आईची सेवा केली तशीच सासऱ्यांची केली. त्यांना हार्ट ॲटॅक आला तर लगेच तो विमानानं आला. दिल्लीहून पुण्याला आणि शेवटपर्यंत त्यांची सेवा केली. माझ्या मैत्रिणीचे मिस्टर त्याला महात्मा गांधी म्हणतात. कोणी सलीम अली म्हणतात. हा वेगळाच मुलगा आहे.

मला एक उंदराचं खेळणं शिकवलं. तो उंदीर जाड कागदाचा बनवलेला होता आणि त्याच्या पोटात एक काचेची गोटी बसवलेली होती. तिच्यामुळे तो सपाट पृष्ठभागावर छान पळतो. दिल्लीत येऊन आम्ही त्या आकाराचा एक डाय बनवला आणि हजारो उंदीर तयार केले.

चीनमधून दरवर्षी ७० कोटी डॉलर्सची खेळणी निर्यात होतात. जगातली ८० टक्के खेळणी मेड इन चायना असतात. आपली निर्यात २० कोटींचीही नाही. आपले उत्पादक चिनी खेळण्यांच्या प्रतिकृती तयार करतात. दिल्लीजवळ नॉइडामधे खेळणी उत्पादकांनी एकत्र येऊन २०० एकर जागा घेतली आहे आणि त्यांना खेळण्यांमध्ये संशोधन करायचं आहे.

शाळेतही खेळणी बनवणं हा एक विषय हवा. त्यात सर्व शास्त्रांच्या विषयांचा उपयोग होईल. युनिसेफला असं वाटलं की सर्व शाळांना विज्ञानशिक्षणाचं साहित्य पुरवावं. तसं पुरवल्यावर आजही ते अनेक शाळांमधून पडून आहे. कारण मुलं आणि शिक्षकांचं त्या वस्तूंशी काही नातं जुळलेलं नाही. आयत्या आलेल्या सर्वच गोष्टी अशा पडूनच राहणार.

मुलांनी शिक्षकांनी शाळेत आपले हात, हृदय, मन एकत्र आणून काम केले, तर त्या निर्माण झालेल्या वस्तूच वापरल्या जातील. नीलबागचे डेव्हिड नेहमी म्हणायचे की, मुलांनी हातांनी काम करायला हवं. पदार्थांचे वेगवेगळे गुणधर्म असतात. त्या त्या पदार्थांची स्वत:ची शिस्त असते. तो पदार्थच सांगतो तुमचं काम बरोबर आहे का नाही. त्यासाठी तिसऱ्या कुणी परीक्षा घ्यावी लागत नाही. वेगवेगळ्या गोष्टींची शैक्षणिक किटस् करून विकणारे लोक आहेत. मी याच्याविरुद्ध आहे. अर्धी गंमत तर वस्तू गोळा करण्यात आहे. मुलांना असं काहीतरी आयतंदेऊन उत्पादकांना पैसे जरूर मिळतात, पण मुलांच्या हाती फारसं काही लागत नाही.

शाळांमध्ये शिक्षक विज्ञान प्रकल्प करतात, पण त्यात नावीन्य काही नसतं. दिल्लीत तर विज्ञान प्रकल्प तयार विकणारं एक दुकान आहे. ५०० प्रकल्प त्यांच्याकडे तयार असतात. अहवालासकट सगळं तयार मिळतं. आपल्याकडे काही करू पाहणारे शिक्षक आहेत. त्यांना दृष्टी मिळायला हवी. शाळांनी नुसते शब्द शिकवायचे नाहीत तर त्यांच्यामागचं जग शिकवायचं आहे. "Not the word but world" टेट्रापॅक इतके फेकले जातात वापरून, त्यांचा वापर करून खेळणी करता येतील, असं साहित्य शोधत राहायला हवं, वापरात आणायला



हवं. मला एका जॉय ऑफ लर्निंग उत्सवात संजय कपूर नावाच मुलगा भेटला. ८वीत होता. त्याला साहित्याची एवढी माहिती आहे! त्यांनी मला जिथे फक्त जुने कागदच मिळतात, अशी दिल्लीत वीस दुकानं दाखवली. तो अनेक खेळणी स्वत:च्या हातांनी तयार करतो. "He has green fingers" आता त्याने शाळा सोडून दिली आणि एका स्कूटरवरून पुस्तके, खेळणी शाळा–शाळांत घेऊन जातो. शाळा त्याला कार्यशाळा घेण्यासाठी बोलावतात, असा तो 'रिसोर्स पर्सन' झाला आहे. असं एक नुसता 'खेळणी' असा विषय काढला की, अरविंद जगभरातल्या गोष्टी सांगू शकतात.

असं हे व्यक्तिमत्त्व आहे. अनेक सुंदर गोष्टीचं मिश्रण. आपल्याला कळत नाही की त्यांच्या या झपाटलेपणात काय अधिक सुंदर आहे! त्यांची विलक्षण बुद्धिमत्ता की बुद्धिमानांपाशी क्वचितच आढळणारा स्वभावातला गोडवा? जे धन आपल्याला सापडलं, ते सर्वांच्यात वाटून देण्याचा उत्साह की जगभराला गवसणी घालून चांगली पुस्तकं मिळवण्याची धडपड? आपल्या जादूच्या बोटांनी खेळणी बनवत राहण्याचं कौशल्य की खेळणी बनवताना ती लहान खेडेगावातल्या मुलालाही बनवता यायला हवीत ही समज? शिक्षकांबद्दलचं प्रेम की मुलांबद्दलच्या

मायेचा सतत खळखळणारा झरा? कुटुंबाबद्दलची आत्मीयता की हजारो माणसांना कुटुंबीय म्हणून जोडण्याचा निर्व्याजपणा? त्यांनी सहज जपलेली मूल्य? त्यांची फकिरी?

जेमतेम पन्नाशीच्या या माणसानं किती मोठं काम केलं आहे! ही एक One man institute आहे. कशी बनतात अशी माणसं? इतका साधेपणा, इतका नि:स्वार्थ, इतकी कार्यशक्ती आणि इतकं मोठं संपर्काचं जाळं!

हा साधेपणा नुसता लेंगा, झब्बा घालण्यातला नाही, जगाची ओळख नसल्याने दिसणारा अजाण साधेपणा नाही. नुसतं मोकळं बोलण्यातला हा साधेपणा नाही, या साधेपणाचा रंग फार गहिरा आहे. आयआयटी कानपूरचा इंजिनिअर मोठ्या पगाराच्या नोकरीत मन रमत नाही, म्हणून फकिरी पत्करतो किंबहुना ती फकिरी त्याच्यात आहे, म्हणूनच त्याचं मन लागत नाही. देशातल्या गरिबीचं सतत भान जागं ठेवून स्वत: जगतो आणि मुलांसाठी काम करतो. शिक्षणाच्या क्षेत्रातल्या पोकळ्या त्याला अस्वस्थ करतात, पण तो नुसता व्यवस्थेच्या नावानं खडे फोडत न बसता या पोकळ्या भरून काढण्यासाठी प्रचंड मेहनत करतो. हसतमुखानं अनेकांना काम करण्याचं बळ देतो.

अनेक जण म्हणतात तसा हा खरंच 'वेडा' म्हणून आहे आणि असे वेडे आहेत म्हणूनच जग सुंदर आहे! भोवतालच्या ''शहाण्यांच्या'' सहवासात येणारं नैराश्य असा एखादा वेडा झडकून टाकतो आणि झपाट्यानं पुढे जातो.

**